
## नवी दिल्लीमध्ये आज ड्रोन महोत्सव



**नवी दिल्ली :** येथील प्रगती मैदानावर भारतातील सर्वांत मोठ्या ड्रोन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २७) या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. ड्रोनच्या माध्यमातून किटकनाशकांची फवारणी कशी करायची, याचे प्रात्यक्षिक या महोत्सवात दाखवण्यात येणार आहे. हा महोत्सव २७ आणि २८ मे दरम्यान होणार आहे. या महोत्सवात ७०हून अधिक जण ड्रोनच्या विविध वापराचे प्रकार दाखवणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी ड्रोन चालवणाऱ्या शेतकऱ्यांशीही संवाद साधणार आहेत. महोत्सवात डिजिटल माध्यमातून ड्रोन पायलट प्रमाणपत्रांचे वितरण, उत्पादनांचे उद्घाटन, पॅनल चर्चा, ऑपरेशन्स दाखविण्यात येणार असून मेड इन इंडिया ड्रोन टॅक्सीची प्रतिकृतीही दाखविण्यात येणार आहे.


शुक्रवार, २७ मे २०२२ ◆ वर्ष १४ ◆ अंक ३०९
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग


पनवेलमधील जि. प.च्या शाळांत ७० टक्के अमराठी विद्यार्थी/३
शर्यतीत बैलांना मारहाण; व्हिडीओ व्हायरल/७
राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत हितेश भोईरची 'सुवर्ण' कामगिरी/८


# रायगडात शिवसेना-राष्ट्रवादी वाद विकोपाला

## ■ काम करण्यात अडचणी येत असल्याची आमदार गोगावलेंची तक्रार

**श्रीवर्धन, पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून शिवसेना आमदार आणि पालकमंत्री आदिती तटकरे यांच्यातील वाद विकोपाला गेल्याचे दिसून येत आहे. नुकतेच शिवसेनेचे महाडमधील आमदार भरत गोगावले यांनी श्रीवर्धन व पोलादपूर येथे झालेल्या शिवसंपर्क अभियान कार्यक्रमात खासदार सुनील तटकरे व पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याविरोधात आरोप करून आपली नाराजी व्यक्त केली.

या कार्यक्रमात आमदार भरत गोगावले म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्रात एकमेव खासदार व पालकमंत्री असे आहेत की, जे शिवसेनेच्या माध्यमातून आलेला विकासनिधी न वापरता तो परत कसा जाईल, यासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे महाविकास आघाडीच्या चौकटीत राहून काम करणे अडचणीचे ठरत असल्याची तक्रारही त्यांनी केली.




रायगड जिल्ह्यात महाविकास आघाडीतील दोन महत्त्वाचे पक्ष असणाऱ्या शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील वाद आता उघडपणे होत असून कार्यकर्त्यांमध्येही अस्वस्थता निर्माण झाली आहे. आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत स्वबळावर सत्ता आणण्याची तयारी शिवसेनेने सुरू केली आहे. त्याचे संकेत शिवसेनेच्या शिवसंपर्क अभियानातून दिले जात आहेत. स्थानिक निवडणुकांमध्ये आघाडी कराची किंवा नाही याचा निर्णय पक्षप्रमुख मुख्यमंत्री उद्धव ठाकरे घेतील, असेही सूचित करण्यात आले आहे. (पान २ वर..)

### पालकमंत्री हटाव मोहीम

*पालकमंत्री कोणत्याही आमदाराला घेऊन चालत नाहीत. विकासकामांच्या उद्घाटनाचा किंवा कुठलाही कार्यक्रम असू दे शिवसेनेच्या तीन आमदारांना योग्य सन्मान दिला जात नाही, अशी तक्रार यापूर्वीही झाली आहे. याशिवाय जिल्ह्यात शिवसेनेचे तीन आमदार आहे, राष्ट्रवादी काँग्रेसचा एकच आमदार आहेत. मग पालकमंत्रीपद शिवसेनेच्या कोणत्यातरी एका आमदाराकडे देण्यात यावे, अशी मागणी सर्व शिवसैनिकांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी मात्र या मागणीची फारशी दखल घेतलेली नाही.*

# गोंडघर येथे समाजमंदिराचे उद्घाटन

## कार्यकर्त्यांनो संघटित व्हा -आमदार प्रशांत ठाकूर



**म्हसळा : प्रतिनिधी**

येथील गोंडघर हनुमान मंडळ स्थानिक व मुंबई यांच्या समाजमंदिराचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २६) करण्यात आले.

या वेळी भाजप दक्षिण रायगड अध्यक्ष ॲड. महेश मोहिते, ज्येष्ठ नेते कृष्णा कोबनाक यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आघाडी सरकार अतिशय चुकीच्या पद्धतीने काम करीत असून राज्यातील विकास खोळंबला आहे. आगामी काळात जिल्हा परिषद व पंचायत समिती, नगरपालिका निवडणूक भाजप स्वबळावर लढणार असून मंडळातील सर्व सदस्यांनी संघटित व्हावे व कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले. त्याचप्रमाणे बदलत्या युगात तंत्रज्ञान स्वीकारून नवीन पिढीला मार्गदर्शन करण्यासाठी या समाजमंदिराचा वापर करावा. (पान २ वर..)

# उलवे नोडमध्ये भव्य सायक्लोथॉन स्पर्धेचे आयोजन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरण दिन आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७१व्या वाढदिवसानिमित्त उलवे नोडमध्ये रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व उलवे सेना यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सायक्लोथॉन स्पर्धा होणार आहे.

या संदर्भातील नियोजन बैठक रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे सीईओ परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. २५) स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे झाली.

या वेळी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, युवा कार्यकर्ते किशोर पाटील, तसेच शेखर काशीद, सचिन आवटे, पल्लवी सुर्वे, सरोज मानवतकर, गुड्डू कनोजिया, अनिल सनस, अमित झा, विकी भिडे, मनोज सिंग, वंची सोम्सकंदन, ओमकार कदम, सरोज, फरहान, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे कार्यालयीन सरचिटणीस अनिल कोळी आदी उपस्थित होते.

# शिवसेना नेते अनिल परब यांच्या घरी ईडीचा छापा

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना नेते अनिल परब यांच्या घरी गुरुवारी (दि. २६) सकाळी ईडीने छापे टाकले आहेत. त्यांच्या शासकीय निवासस्थानासोबत त्यांच्याशी संबंधित सात ठिकाणावर छापे टाकण्यात आले आहेत. त्यानंतर अनिल परब यांचे निकटवर्तीय संजय कदम यांच्या घरीही ईडीने छापा टाकला आहे.

ईडीचे अधिकारी सकाळी अनिल परब यांच्या वांद्रे येथील घरी आणि मरिन ड्राईव्हमधील सरकारी निवासस्थानी दाखल झाले. यासोबत पुणे आणि रत्नागिरीमधील अनिल परब यांच्या मालकीच्या जागांचीही पाहणी केली जात आहे. मनी लॉण्डरिंग प्रकरणातील ईडीच्या या कारवाईनंतर परब यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

## निवडक

### सचिन वाझे होणार माफीचा साक्षीदार

**मुंबई :** मनसुख हिरेन आणि वसुलीच्या आरोपांखाली अटकेत असलेल्या सचिन वाझेंनी माफीचा साक्षीदार होण्यासाठी अर्ज केला आहे. सचिन वाझेंनी याआधी फेब्रुवारी महिन्यात ईडीला पत्र लिहून अशीच विनंती केली होती. आता याच प्रकरणात सचिन वाझेंनी कलम ३०६ अंतर्गत वकील रौनक नाईक यांच्यामार्फत माफीचा साक्षीदार होण्यासाठी अर्ज केला आहे. सचिन वाझेंचे सीबीआय कोर्टासमोर साक्ष होणार आहे.

### व्यावसायिक अविनाश भोसले अटकेत

**पुणे :** पुण्यातील बांधकाम व्यावसायिक अविनाश भोसले यांना गुरुवारी (दि. २६) डीएचएफएच प्रकरणी सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. गेल्या महिन्यात अविनाश भोसले यांच्या घर आणि कार्यालयावर सीबीआयने छापेमारी केली होती. डीएचएफएल घोटाळा प्रकरणी सीबीआयने छापेमारी केली होती. अविनाश भोसले हे काँग्रेसचे राज्यमंत्री विश्वजीत कदम यांचे सासरे आहेत.

# भाजपचे मिशन २०२४

## बूथ बळकटीकरणावर देणार भर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२०२४मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकांच्या तयारीसाठी भाजपने आता पावले उचलायला सुरुवात केली आहे. मोदी सरकारला आठ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाजपने आपल्या केंद्रीय मंत्र्यांना देशभरातील १४०हून अधिक मतदारसंघांना भेटी देण्यास सांगितले आहे.

ज्या मतदारसंघात २०१९मध्ये भाजपचे उमेदवार पराभूत झाले त्या मतदारसंघात जास्त लक्ष देण्यात येणार आहे. आमदारांना २५ मे ते ३१ जुलै या कालावधीत बूथ बळकटीकरण मोहिमेचा भाग म्हणून मतदारांना भेटी देण्यास सांगण्यात आले आहे. एका आमदारावर २५ बुथवर लक्ष देण्याची जबाबदारी असेल ज्यात पक्षाचे १० कार्यकर्ते सहाय्य करतील. या मोहिमेत सरकारी योजना आणि योजनांची अंमलबजावणी प्रमुख मुद्दा असणार आहे.

### ■ पक्ष विस्तारासाठी राज्यांमध्ये चार प्रमुख नेत्यांची टीम

ज्या राज्यात पक्षाला विस्तार कार्यक्रम राबवण्याची अधिक गरज असेल, तिथे चार प्रमुख नेत्यांची एक टीम सूत्र हातात घेऊन पक्ष मजबुतीकरण मोहीम राबविली जाईल. भाजपच्या मुख्य कार्यालयात झालेल्या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी २०२४च्या निवडणुकीपूर्वी या मोहिमेच्या माध्यमातून जनसंपर्क कार्यक्रम अधिक तीव्र करण्याचे आदेश दिले आहेत.







# भाजप राज्यसभेची तिसरी जागा लढून जिंकू शकते

## ■ प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा आत्मविश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय नेतृत्वाने आदेश दिला तर प्रदेश भाजप राज्यसभेची तिसरी जागा लढवेल आणि जिंकेलही असा आत्मविश्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी (दि. २६) मुंबईत प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

चंद्रकांत पाटील म्हणाले, भाजपाचे विधानसभेतील संख्याबळ ध्यानात घेता राज्यसभा निवडणुकीत पक्षाचे दोन उमेदवार सहज निवडून येतात. त्याखेरीज अतिरिक्त मतांच्या जोरावर भाजपा तिसरी जागा लढवून जिंकू शकते. या निवडणुकीच्या बाबतीत पक्षाचे केंद्रीय नेतृत्त्व निर्णय घेत असल्याने त्यांच्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही होईल. राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेचा एक उमेदवार निवडून येऊ शकत असताना तो पक्ष सहाव्या जागेसाठी दुसरा उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवत असल्याबद्दल प्रतिक्रिया विचारली असता प्रदेशाध्यक्षांनी वरील टिप्पणी दिली.



शिवसेनेने या निवडणुकीत काय करावे हा त्या पक्षाचा प्रश्न आहे. मात्र राज्यसभा निवडणुकीत प्राधान्यक्रमाच्या मतदानाच्या पद्धतीमुळे दोन उमेदवार लढविण्याच्या प्रयत्नात कधी कधी मूळ उमेदवार पराभूत होतो, हे ध्यानात घ्यावे असे ते म्हणाले.

शिवसेना नेते व परिवहनमंत्री अनिल परब यांच्या निवासस्थानावर ईडीने मारलेल्या छाप्याविषयी प्रतिक्रिया देताना चंद्रकांत पाटील म्हणाले की, केंद्रीय तपास यंत्रणा संविधानाच्या चौकटीत स्वतंत्रपणे काम करत आहेत. त्याविषयी आपण कोणतीही टिप्पणी करणार नाही असे ते म्हणाले.

तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर कारवाई होत नसल्याचे पाहून जयश्री पाटील उच्च न्यायालयात गेल्या आहेत. त्यांच्या अर्जाच्या आधारावर उच्च न्यायालयाने सीबीआय चौकशीचा आदेश दिला व कारवाई झाली हे विसरता येणार नाही. न्यायालयाचा दरवाजा सर्वांसाठी खुला आहे. केंद्रीय यंत्रणांकडून होणाऱ्या कारवाईबाबत शिवसेनेला काही गैर वाटत असेल तर त्यांनी न्यायालयाकडे दाद मागावी असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

महाविकास आघाडी सरकार तिहेरी चाचणी पूर्ण करून ओबीसी राजकीय आरक्षण पुन्हा मिळवत नाही याचा संताप व्यक्त करताना आपण राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याविषयी ग्रामीण पद्धतीने बोललो. ज्या ओबीसी समाजाच्या प्रेमातून हा सात्विक संताप व्यक्त केला त्यांना त्यामुळे आनंदच झाला. यामध्ये सुप्रिया सुळे किंवा कोणत्याही महिलेचा अनादर करण्याचा मुद्दा नाही. आपण जे मत व्यक्त केले त्याबाबतीत पराचा कावळा करू नये, असेही पाटील म्हणाले.

# अनिल परब यांना अटक झालीच पाहिजे

## भाजप नेते किरीट सोमय्या यांची घणाघाती टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

अनिल परब यांना अटक व्हायलाच हवी. त्यांच्यावर मनी लाँड्रिंगप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून परबांनी अनेक गुन्हे केल आहेत. अनिल परबांवर सहा वेगवेगळ्या खात्याकडून कायदेशीर कारवाई सुरू असून दापोलीत २५ कोटींचे रिसोर्ट हा व्यवहार त्यांनी दाखविला नाही. कोविड आणि लॉकडाऊन काळात हे रिसोर्ट झाले. त्यासाठी २४ कोटी रक्कम वापरली. त्यांना अटक ही झालीच पाहिजे असा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

गुरुवारी सकाळी ६.३० वाजण्याच्या दरम्यान परिवहन मंत्री अनिल परब यांच्या ७ ठिकाणी ईडीने छापे टाकले. अनिल परब यांची रिसॉर्ट पाडण्याची मुदत २ मे लाच संपली आहे. त्यांनी रिसॉर्ट बांधण्यासाठी २४ कोटी रोख रक्कम वापरली. यावर संशोधन झाले पाहिजे. अनिल परबांची संपत्ती बेनामी म्हणून येत्या काळात घोषित होईल,

**उद्धव ठाकरे काही करु शकत नाहीत**

*टॉयलेट घोटाळ्यात संजय राऊत यांनी १०० कोटींचा आरोप केला. मात्र त्यांनी १०० पैशांचे देखील पुरावे अद्याप दिलेले नाही. संजय राऊत आणि उद्धव ठाकरेंना महाराष्ट्राच्या जनतेला लुटायचे आहे. ते त्यांच्या मंत्र्यांना वाचविण्याचे प्रयत्न करत आहेत. रश्मी ठाकरेंचा १९ बंगल्यांचा घोटाळा मी बाहेर काढला तरी, उद्धव ठाकरे काही बोलत नाहीत, ते अनिल परबांना काय वाचविणार, असा सवाल सोमय्यांनी केला आहे.*

असा इशारादेखील सोमय्या यांनी दिला आहे.

सोमय्या हे परब यांच्यावर टीका करताना पुढे म्हणाले, अनिल परबांना सचिन वाझेंनी पैसे दिले आहेत का? याचा देखील तपास झाला पाहिजे असेही ते म्हणाले.

अनिल परब यांचे तुरुंगात जाणे हे निश्चित आहे. अनिल देशमुख यांच्यानंतर अनिल परब जेलमध्ये जाणार



आहेत. त्यांच्यावर सहा वेगवेगळ्या डिपार्टमेंटद्वारा कायदेशीर प्रक्रिया कारवाईची सुरुवात झाली आहे. ईडीने दापोलीत असलेल्या रिसॉर्टवरुन त्यांच्यावर कारवाई केली आहे. आपल्याला विश्वास आहे की, ईडी कारवाईनंतर सीबीआय, एनआयए, महाराष्ट्र पोलिस देखील या कारवाईत भाग घेतील, असेही सोमय्या म्हणाले.

मंत्री हसन मुश्रीफ यांच्याविरोधात देखील एक तक्रार ईडीकडे दाखल झाली आहे. त्यांच्या १५८ कोटींच्या मनी लाँड्रिंग प्रकरणात चौकशी होणार आहे. मुश्रीफ यांच्यावर आयकर विभागाने ९२ कोटींची बेनामी संपत्तीची नोटीस दिली आहे. त्यानंतर पाटणकर म्हणजे उद्धव ठाकरे परिवार, रश्मी ठाकरेंचा भाऊ श्रीधर पाटणकरांचे १३ फ्लॅट ईडीने जप्त केले आहेत.

यशवंत जाधवांविरोधात आज-उद्या चिटींग फ्रॉडप्रकरणी गुन्हा दाखल केला जाणार आहे. त्यांच्यावर देखील ईडीने चौकशी सुरू केलेली आहे. आदित्य ठाकरे यांनी नंदकिशोर चतुर्वेदी यांच्यासोबत सात कोटींचा मनी लाँड्रिंगचा व्यवहार केला आहे. या चौघांविरोधात ईडी चौकशी सुरू आहे. या चौघांमध्ये पहिला कोण? लवकरच कळेल, असे सोमय्या म्हणाले. यावेळी सोमय्या यांनी ठाकरे सरकारवर कडाडून टीका केली.

# ‘यूजीसी नेट’च्या अर्जासाठी आता ३० मेपर्यंत मुदत वाढविली

**पुणे : प्रतिनिधी**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राष्ट्रीय पात्रता परीक्षेच्या अर्जासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता उमेदवारांना ३० मेपर्यंत अर्ज भरता येईल. यूजीसीचे अध्यक्ष प्रा. जगदेशकुमार यांनी ट्विटद्वारे ही माहिती दिली आहे.

राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणातर्फे (एनटीए) यूजीसी नेट ही परीक्षा वर्षांतून दोन वेळा घेतली जाते. मात्र कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे डिसेंबर २०२१ची परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. त्यामुळे परीक्षांचे सत्र सातत्य कायम ठेवण्यासाठी डिसेंबर २०२१ आणि जून २०२२ ची परीक्षा एकत्रितरीत्या घेतली जाणार आहे. उमेदवारांकडून मुदतवाढीची मागणी करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर अर्जासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. अर्ज आणि शुल्क भरण्यासाठी आता उमेदवारांसाठी ३० मे ही अंतिम मुदत असेल, असे प्रा.जगदेशकुमार यांनी ट्विटमध्ये नमूद केले आहे. उमेदवारांना अधिक माहिती ही संकेतस्थळावर मिळणार आहे.

# औरंगाबादजवळ एसटी-पीकअप अपघातात पाच जणांचा मृत्यू

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

औरंगाबाद जिल्ह्यातील करमाडजवळ एसटी बस आणि पीकअप वाहनाचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे, तर दोन जण जखमी झाले आहेत.

औरंगाबाद-जालना रस्त्यावरील गाढे पिंपळगावजवळ राज्य परिवहन महामंडळाची बस (एम. एच. १३ सी. यू. ६८३८) व पीकअप बोलेरो (एम. एच. २१ बी. एच. ४३३१) या वाहनांमध्ये बुधवारी (दि. २५) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास अपघात झाला. या अपघातात पाच जणांचा मृत्यू, तर दोन जण जखमी झाले.

अपघातातील मृतांमध्ये लहू ज्योतीराम राठोड (वय ५०, रा. रेणुकानगर, औरंगाबाद), अशोक जयसिंग चव्हाण, रणजित जयसिंग चव्हाण, शांतीलाल हरी चव्हाण (तिघेही रा. सातारा तांडा) व लता उर्फ पारूबाई ज्ञानेश्वर जाधव (रा. राजनगर बायपास, औरंगाबाद) यांचा समावेश आहे. विकास ढेरे व रोहित विकास ढेरे (दोघेही रा. गुरु लॉन्सच्या मागे, औरंगाबाद) हे दोघे जखमी झाले. मृतांमध्ये दोन भावांचा समावेश आहे. अपघाताची माहिती मिळताच करमाड पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र बोडके पथकासह दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृत व जखमींना बाहेर काढले. उपचारासाठी जखमींना व उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह रुग्णालयात पाठविण्यात आले.



घटनास्थळी पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया, पोलीस उपविभागीय अधिकारी जयदत्त भवर यांनी भेट दिली.

# आ. कालीदास कोळंबकरांच्या उपोषणाला प्रविण दरेकर, आशिष शेलार यांचा पाठिंबा

## ■ बीडीडी चाळीत पोलिसांना मोफत घरे देण्याची मागणी

**मुंबई: प्रतिनिधी**

बीडीडी चाळ पुनर्वसनात पोलिसांना हक्काची मोफत घरे द्या अशी मागणी करीत उपोषणाला बसलेल्या आमदार कालिदास कोळंबकर यांच्या मागणीला समर्थन देत विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर आणि आमदार अॅड आशिष शेलार या उपोषणात सहभागी झाले.

वरळीतील बीडीडी चाळीत अन्य शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या पद्धतीने निवासस्थाने दिली त्याच पद्धतीने पोलिसांना मोफत निवासस्थाने द्या, अशी मागणी भाजपाचे आमदार कालिदास कोळंबकर हे करीत असून या



मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी नायगाव येथे लाक्षणिक उपोषण केले.

बीडीडी चाळीत राहणाऱ्या पोलिसांना घर घेण्यासाठी ५० लाख रुपये मोजावे लागणार असल्याचे गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी जाहीर केले आहे. बीडीडी चाळीत राज्य सरकारने शासकीय कर्मचाऱ्यांना हक्काची घरे दिली. बीडीडी चाळीचे पुनर्वसन करताना अन्य शासकीय कर्मचाऱ्यांना जो न्याय लावला तोच न्याय पोलीस कर्मचाऱ्यांना लावला गेला पाहिजे असे कोळंबकर यांचे म्हणणे असून माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांना हक्काची घरे देण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाप्रमाणे राज्य सरकारने पोलिसांना हक्काची घरे द्यावीत, असेही कोळंबकर यांचे म्हणणे आहे

या उपोषणात सहभागी होताना आमदार अॅड. आशिष शेलार यांनी सांगितले की, या मागणीला भाजपाचे मुंबईतील तिन्ही खासदार विधानसभा आणि विधान परिषदेतील आमदार या सगळ्यांचा पाठिंबा असून पोलिसांसाठी जो संघर्ष कोळंबकर करीत आहेत, त्या संघर्षात भाजपा पुर्णपणे त्यांच्या पाठीशी आहे. उपोषणात पोलीस सहभागी झाले नाहीत त्यांनी कुठल्याही पक्षाच्या अशा व्यासपीठावर जाऊही नये पण पोलिसांच्या पत्नी ज्या पद्धतीने यामध्ये सहभागी झाल्यात ती ताकद ठाकरे सरकारला अजून कळलेली नाही, हा इशारा आहे असे समजावे असेही आमदार अॅड.आशिष शेलार म्हणाले.

# ‘समाजक्रांतिकारक सावरकर’ लघुपटाचे भगूरवाड्यात शनिवारी लोकार्पण

## सावरकर स्मारकाची स्वातंत्र्यवीरांच्या १३९व्या जयंतीदिनी आगळी भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १३९ व्या जयंतीदिनी म्हणजेच २८ मे २०२२ या दिवशी सकाळी ११ वाजता त्यांच्या जन्मस्थळ असलेल्या नाशिकजवळच्या भगूर येथील सावरकरवाड्यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाने तयार केलेल्या समाजक्रांतिकारक सावरकर या लघुपटाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचलनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्याहस्ते हे लोकार्पण होणार आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जन्मस्थळ असणाऱ्या भगूर वाड्यात असलेल्या वस्तुसंग्रहालयात २८ मे २०२२ पासून दररोज या लघुपटाचा लाभ भगूर येथील या वाड्यामध्ये येणाऱ्यांना घेता येईल.

सुमारे एक तासाचा हा लघुपट आहे. यामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी रत्नागिरी येथील आपल्या स्थानबद्धतेच्या काळात जी समाजक्रांतिकारी अशी कामगिरी केली. ज्यामध्ये हिंदुत्त्व हे पुस्तक लिहिले, पतितपावन मंदिरात जातिभेद संपुष्टात आणण्यासाठी केलेला सर्व हिंदुंच्यासाठी असलेल्या मंदिरप्रवेशाचे कार्य, स्पृशास्पृश्यांची दरी संपवणारे सहभोजनाचे आयोजन, हळदीकुंकू समारंभाचे आयोजन, हिंदुधर्मातील सातबेड्यांना तोडण्याचे कार्य करून त्याकाळात सावरकर यांनी केलेले कार्य हे समाज क्रांतिकारकाचेच होते. त्यांच्या या कार्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून सावरकर स्मारकाने या लघुपटाची निर्मिती केली आहे.

भगूर येथे होणाऱ्या या कार्यक्रमामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजित सावरकर, कार्यवाह राजेंद्र वराडकर, शैलेंद्र चिखलकर, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे नाशिक विभागाच्या सहाय्यक संचालक आरती आळे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती देण्यात आली आहे.

## मानसिक तणावातून वकिलाची आत्महत्या

**नागपूर :** कोरोना आजारामुळे निर्माण झालेल्या मानसिक तणावातून वकीलाने अंबाझरी तलावात उडी घेत आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी (दि. २६) सकाळी साडेआठ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. त्यामुळे वकील समुदायात एकच खळबळ उडाली आहे. प्रविण केशवराव तपासे (वय ५४ रा. चंदननगर) असे वकीलाचे नाव आहे.

पान १ वरून

## रायगडात शिवसेना-राष्ट्रवादी वाद विकोपाला

त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये सर्वच ठिकाणी फूट पडत असल्याने याचा फटका आगामी निवडणुकांमध्ये बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या वेळी आमदार भरत गोगावले यांनी महाविकास आघाडीच्या चौकटीत राहून काम करण्यात अडचणी येत असून मित्रपक्ष असूनही राष्ट्रवादी काँग्रेस केवळ शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना फितवून त्यांना आपल्या पक्षाकडे वळविण्याचे काम करीत असल्याचा आरोप करून महाविकास आघाडीला घरचा आहेर दिला.

## गोंडघर येथे समाजमंदिराचे उद्घाटन

या कार्यक्रमाला तालुकाध्यक्ष प्रकाश रायकर, श्रीवर्धन तालुकाध्यक्ष प्रशांत शिंदे, माणगाव तालुकाध्यक्ष संजय ढवळे, रोहा तालुकाध्यक्ष सोपान जांभेकर, सरचिटणीस सुनील शिंदे, महेश पाटील, शहर अध्यक्ष संतोष पानसरे, उपाध्यक्ष भाजप तथा सरपंच लहू तूरे, उपाध्यक्ष समीर धनसे, जिल्हा चिटणीस तुकाराम पाटील, भालचंद्र करडे, चिटणीस मनोहर जाधव, रमेश पोटले, गोविंद भायदे, महिला मोर्चाध्यक्षा सुनंदा पाटील, माणगाव महिला मोर्चा अश्विनी महाडीक, प्रियंका शिंदे, रुपा भायदे, उपस्थित होत्या. आशुतोष पाटील, किशोर भोईनकर, सुधाकर शिके, प्रशांत महाडीक, सुबोध पाटील, ग्रामीण अध्यक्ष जगन्नाथ तूरे, मुंबई मंडळ अध्यक्ष निलेश तूरे, महिला मंडळ अध्यक्ष वैशाली लहू तूरे, बुथ अध्यक्ष पंकज भाये यांनी सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# सिडको हस्तांतरीत भागांतील मान्सूनपूर्व नालेसफाई कामाची आयुक्तांकडून पाहणी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रांतील मान्सुनपूर्व नाले सफाई कामांचा आढावा आयुक्त गणेश देशमुख यांनी घेतला. चारही प्रभागातील विविध ठिकाणच्या नाल्यांची पाहणी केली. यावेळी पालिका क्षेत्रात पावसाळ्यात पाणी साठणाऱ्या विविध भागांची माहिती घेऊन ते साठू नये यासाठी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

पावसाळ्यामध्ये पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये याकरिता पनवेल महानगरपालिकेने कंबर कसली आहे. यासाठी पनवेल नगरपरिषद हद्दीतील नाल्यांची साफसफाई व ग्रामीण भागांतील नाल्यांची साफसफाईची कामे यापूर्वीच सुरू करण्यात आले आहे. सर्व सिडको अधिकाऱ्यांशी संपर्क करून पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी १२ मे रोजी संयुक्त बैठक आयोजित केली होती. या बैठकित दिलेल्या निर्देशानूसार उपायुक्त सचिन पवार यांच्या अध्यक्षतेखाली सिडको व महापालिकेची संयुक्त कमिटी बनवून शहरातील सर्व नाल्यांची पाहणी १८ मेपर्यंत पूर्ण करण्यात आली होती. त्यानुसार नालेसफाईच्या कामास युध्दपातळीवर सुरूवात करण्यात आली आहे. नुकतीच खारघर, कळंबोली, कामोठे क्षेत्रातील सिडकोकडून हस्तांतरीत करण्यात आलेल्या या नाल्यांची पाहणी आयुक्तांनी केली. यावेळी उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, संबंधित प्रभाग अधिकारी व मुख्य आरोग्य निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते. सिडको हद्दितील नाल्यांचे हस्तांतरण झाल्यानंतर ताबडतोब चारही प्रभागातील नालेसफाईच्या स्वतंत्र निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामास सुरूवात करण्यात आली आहे.







पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. २७ मे २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
■ ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
■ ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
■ ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
■ ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# पनवेलमध्ये ७० टक्के अमराठी विद्यार्थी

## जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील स्थिती

**पनवेल : प्रतिनिधी**

रायगड जिल्हातील पनवेल तालुक्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत ७० टक्के अमराठी मुले शिक्षण घेत असल्याने विद्यार्थी व शिक्षकांना अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे अनेक मुले अर्धवट शिक्षण सोडून जात असल्याने 'शिक्षण हक्क कायद्याचा' भंग होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेने हिन्दी माध्यमाची शाळा सुरू करावी किंवा शिक्षकांची नेमणूक करणे आवश्यक आहे.



### बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद

*भारतीय संविधानाच्या कलम २१-अ अंतर्गत ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण उपलब्ध करण्याची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण हक्क कायद्यामुळे बालकांना उत्तम दर्जाचे प्राथमिक शिक्षण मिळविण्याचे अधिकार प्राप्त झाले आहे. बालकांना बालस्नेही (चाईल्ड फ्रेंड्ली) वातावरणामध्ये सहज व सोप्या पद्धतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी अधिनियम व नियमावलीमध्ये विविध तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.*

मुंबईचे प्रवेशद्वार समजले जाणाऱ्या पनवेल शहराचा व आजूबाजूच्या परिसराचा नैना प्रोजेक्टमुळे मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. रेल्वेचे टर्मिनन्स ही पनवेल येथे होणार आहे. त्यामुळे पनवेलचे महत्व वाढत असून. येथील नागरीकरण प्रचंड वेगाने वाढत आहे. उद्योगधंदे वाढल्याने मोठ्या प्रमाणात परप्रांतीय मजूरवर्ग पनवेल व आजूबाजूच्या परिसरात राहायला आला. यामध्ये अशिक्षित मजुरांचे व त्यांच्या कुटुंबियांचे प्रमाण अधिक आहे. बहुसंख्य मजूर तालुक्यातील खेडेगावात राहत आहेत. त्यांची मुले तेथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेण्यासाठी जातात.

पनवेल तालुक्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत २१ हजार विद्यार्थी आहेत. यामध्ये ७० टक्के मुले ही परप्रांतीय आहेत. २५ टक्के मुले ही राज्यातीलच पण दुसऱ्या जिल्ह्यातून आलेली व पाच टक्के मुले स्थानिक आहेत. स्थानिक लोकांनी आपली मुले शहरातील इंग्लिश मिडियमच्या शाळेत घातली आहेत. त्यामुळे समाजातील गरीब वर्गांतील मुलेच जिल्हा परिषदेच्या शाळेत जातात. त्यातील बहुसंख्य मुले ही परप्रांतीय असल्याने त्यांना मराठी समजत नाही. त्यांची भाषा शिक्षकांना येत नसल्याने त्यांना बालस्नेही (चाईल्ड फ्रेंड्ली) वातावरणामध्ये सहज व सोप्या पद्धतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे अनेक मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. पनवेल तालुक्यात प्राथमिक शाळा २४ असून त्यामध्ये एकूण ४८ शिक्षक व २१ हजार विद्यार्थी आहेत.

> **जिल्हा परिषदेच्या शाळेत परप्रांतीय विद्यार्थी जास्त आहेत. त्यांना शिकवताना शिक्षकांना अनेक अडचणी येतात. त्यांच्यासाठी हिन्दी माध्यमाची शाळा सुरू केली तरी आपल्याकडे हिन्दी माध्यमातील डी.एड शिक्षक नाहीत. याशिवाय मराठी माध्यमातील शिक्षक अतिरिक्त होतील त्यांच्या समायोजनाचा प्रश्न निर्माण होईल.**
> **-सीताराम मोहिते, शिक्षण विस्तार अधिकारी, पनवेल पंचायत समिती**

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली

# खारघरमधील नालेसफाईबाबत आढावा बैठक

**खारघर : रामप्रहर वृत्त**



खारघरमधील नालेसफाईबाबत पनवेल महानगरपालिकेत खारघरमधील नगरसेवक, पदाधिकारी, स्थायी समिती सभापती ॲड. नरेशजी ठाकूर यांच्या उपस्थितीत सभागृह नेते श्री परेशजी ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक गुरुवारी (दि. २६) झाली.

या बैठकीमध्ये सभागृह नेते श्री परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर, प्रभाग समिती 'अ'च्या सभापती संजना कदम, भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक शत्रुघ्न काकडे, युवा नेते समीर कदम, मंडल उपाध्यक्ष दिलीप जाधव, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. विधाते व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

पावसाळ्याच्या तोंडावर सिडकोने नालेसफाई व गटारसफाई ही पनवेल महानगरपालिकेची कामे आहेत असे कळवित हात झटकले, असे कळताच खारघरमधील नगरसेवकांनी हा विषय महत्त्वाचा असल्याने प्रथम प्राथमिकतेने करा, अशी आग्रही मागणी केली. पनवेल महानगरपालिकेने ही संयुक्त सर्वेक्षण करून तातडीने नालेसफाईच्या कामास सुरुवात केली असून खारघर प्रमुख नाल्यांची सफाई चालू करण्यात आली आहे.

सिडकोने गेल्या वर्षात नालेसफाई व रेनवॉटर गटारांची थातुरमातुर सफाई करण्याचा देखावा केला आहे. पावसाळ्यापूर्वी सफाईचे अवघड काम पूर्ण करण्याचे आव्हान आहे, पण पनवेल महानगरपालिकेने हे आव्हान स्वीकारत ज्या भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहते त्या भागातील अडथळे प्रथम बाजूला करून पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होईल यासाठी युध्द पातळीवर कामास सुरुवात केली आहे, असे उपस्थित पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले. काही सखल भागांमध्ये पावसाचे पाणी साचते ते पंपाद्वारे उपसण्याचे नियोजन पालिका करीत आहे.

नालेसफाईबाबत सभागृह नेते परेश ठाकूर विशेष आग्रही असून ते स्वतः होणाऱ्या प्रगतीविषयी वेळोवेळी पाहणी करणार आहेत. येत्या पावसाळ्यात खारघरवासीयांना कमीत कमी त्रास होईल यासाठी खारघरमधील सर्व भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक प्रयत्नशील राहणार आहेत.

# भाजपतर्फे कासपमध्ये आरोग्य शिबिर

## नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील कासप येथे केळवणे भाजप विभागाचे अध्यक्ष किरण माळी यांच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याचा १००हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.



या वेळी एमजीएम हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी नागरिकांची आरोग्य तपासणी करून आजार असणाऱ्यांना मार्गदर्शन केले. केळवणे जिल्हा परिषद भाजप विभागाचे अध्यक्ष किरण माळी, पोलीस पाटील सुजाता माळी, माजी उपसरपंच मुकेश पाटील, माजी उपसरपंच मिनल ठोंबरे, मंगेश वाकडीकर, प्रमिला पाटील, योगेश पाटील, सुनिल माळी, अलका जांभळे, रघुनाथ सोनघरे, संजय जांभळे, आशा वर्कर कविता चौधरी आदी उपस्थित होते.

# न्हावेखाडी येथे भाजपतर्फे आरोग्य शिबिर

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्याचे भाग्यविधाते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७१वा वाढदिवस येत्या २ जूनला साजरा होणार आहे. त्यापार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यानुसार न्हावेखाडी-उत्तर पाडा येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने भव्य महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी उत्तरपाडा येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्यसाधून मोफत भव्य महा आरोय शिबिर आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांना तपासणी केली तसेच त्यांना मार्गदर्शन केले. या शिबिराचा लाभ परिसरातील अनेक नागरिकांनी घेतला. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, न्हावेच्या उपसरपंच मंजुषा ठाकूर, माजी उपसरपंच सागरशेठ ठाकूर, शिबिराचे संयोजक तथा भाजप नेते सी. एल. ठाकूर, माजी ग्रामपंचायत सदस्य अरुणशेठ ठाकूर, गोपिचंद ठाकूर, अनंत कडू, तुकाराम मोकल, प्रदीप मोकल, सतीश ठाकूर, सुजित ठाकूर, अनंत ठाकूर, हिराजी ठाकूर, चंद्रकांत मोकल, प्रवीण कालबागे, डी. वाय. पाटील हॉस्पिटलचे डॉ. श्याम मोरे, यांच्यासह पदाधिकारी आणि डॉक्टर उपस्थित होते.

# नवीन पनवेलमध्ये व्हीएन ट्रान्स लाईन व्यवसाय सुरू

## कार्यालय व केबिनचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर ४ येथे व्ही. एन. ट्रास्न लाईन हा नवीन व्यवसाय विक्रांत म्हस्कर आणि नितेश घुगे यांनी सुरू केला आहे. त्यांच्या या नवीन व्यवसायाच्या कार्यालयाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते तर केबिनचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २६) करण्यात आले.

नवीन पनवेल येथे विक्रांत म्हस्कर आणि नितेश घुगे यांनी व्ही. एन. ट्रान्स लाईन हा सिमेंट, ट्रान्सपोर्ट, बिल्डींग मटेरीयल सप्लायचा नवीन व्यवसाय सुरू केला. त्यांच्या या नवीन व्यवसायाच्या कार्यालयाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले असून, त्यांनी पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.






या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, पनवेलच्या उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय कांडपिळे, भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, शशिकांत भगत, पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील, भिवंडीचे माजी महापौर तुषार चौधरी, प्रशांत पाटील, नवी मुंबई मनपाचे माजी सभापती अशोक पाटील, नेरेच्या सरपंच राजश्री म्हस्कर, युवा मोर्चाचे अभिषेक भोपी, नवी मुंबई मनपाचे नगरसेवक निशांत भगत, संजय म्हस्कर, जगदीश म्हस्कर, एकनाथ घुगे, प्रकाश घाडगे, वासुदेव गवते, पं. स. सदस्य राज पाटील, जितेश मगर, डॉ. रोशन पाटील, अमोघ प्रशांत ठाकूर, जागृती भगत, जल्पा चौधरी, स्वप्नाली पाटील, समीक्षा घुगे आदी उपस्थित होते. या वेळी शुभांगी म्हस्कर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.




**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, अंकुश पाटील, रवींद्र पाटील, दिगंबर साठे, समीर पाटील, सुचित फुटाने, अमित जाधव, अजय मोरे आदी उपस्थित होते. दरम्यान, भाजपचे युवा नेते हॅप्पी सिंग यांच्या कार्यालयात विश्वजीत पाटील यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला.**

# भाजप उरण शहर उपाध्यक्षपदी नंदा माजगावकर

**उरण : वार्ताहर**

भाजप उरण शहर उपाध्यक्षपदी नंदा उल्हास माजगावकर यांची गुरुवारी (दि. २६) नियुक्ती करण्यात आली. आमदार महेश बालदी यांनी माजगावकर यांना नियुक्तीचे पत्र देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजप उरण तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, शहर उपनगराध्यक्ष जयविन कोळी, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, तालुका सदस्य विश्रांती म्हात्रे आदी उपस्थित होते.





**पनवेल : हॅप्पी मॅन ग्रुपच्या वतीने आप्पा मानकामे यांचा ८६वा वाढदिवस साजरा करण्यात आला.**

## खारघरमध्ये कार अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल :** खारघरमधील सेक्टर २ येथे एका कारने दगडी डिव्हायडरला धडक दिली. यात कारचालकाचा मृत्यू झाला आहे. प्रमोद परशुराम गायकवाड हे त्यांची इनोवा (एमएच ०४ ईएक्स ७५९१) गाडी बेलापूरच्या दिशेने घेऊन जात होते. या वेळी गाडीवरील ताबा सुटल्याने गाडीची रस्त्यावरील डीवाईडरला धडकली. यात त्यांचा मृत्यू झाला.

# खारघरमधील नायजेरियन नागरिकांच्या वाढत्या संख्येबाबत भाजपचे पोलिसांना निवेदन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर शहरातील सेक्टर १२ मधील ए, बी, सी ब्लॉक मध्ये मागील तीन चार महिन्यांपासून नायजेरियन नागरिकांची संख्या कमालीची वाढलेले दिसून येत आहे. या नागरिकांवर कारवाई करण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन भाजपच्या शिष्टमंडळाने खारघर पोलिसांना दिले आहे.



खारघरमध्ये वास्तव्य करणाऱ्या नायजेरियन नागरिकांमधील अनेक जण कुटुंबासहित राहात आहेत, शिवाय महाराष्ट्र पासिंगच्या गाड्या चालवताना दिसून येत आहेत. रात्री उशिरापर्यंत त्यांची ये-जा चालू असते. एकंदरीत त्यांची वागणूक संशयाला वाव देणारी दिसून येत आहे. हे नागरीक कुठे राहतात? एका घरात किती जण राहतात? त्यांनी घरमालकांबरोबर भाडेकरार केलेला आहे का? ते नक्की काय व्यवसाय करतात? पोलीस स्टेशनला त्याची नोंद आहे का? याची चौकशी व्हावी; भविष्यात या नायजेरियन नागरिकांकडून काही अनुचित प्रकार घडले तर परिसरातील नागरिकांना मनस्ताप सहन करावे लागेल, शिवाय या अंमली पदार्थ विक्रीमध्ये नायजेरियन व्यक्तींचा सहभाग असतो. त्यामुळे स्थानिक तरुण नशेच्या आहारी जाणार नाहीत याची काळजी घ्यायला हवी.

जास्त भाडे मिळत असल्याने काही घरमालक अश्या नागरिकांना अनधिकृत वास्तव देत असतात. व्हिसा संपून गेल्यावर सुद्धा अनेक जण राहत असतात.

या आशयाचे पत्र नागरिकांच्या मागणीनुसार देत असल्याची माहिती भाजपचे खारघर मंडलचे सरचिटणीस दीपक शिंदे यांनी दिली तर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी वरील विषयाची लवकरात लवकर चौकशी करावी व काही गैर असेल तर योग्य कारवाई करावी असे सांगितले.

निवेदन देताना भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, पनवेल महानगरपालिकेचे प्रभाग ५ चे नगरसेवक शत्रुघ्न काकडे, रामजी बेरा, सरचिटणीस दीपक शिंदे, किर्ती नवघरे, युवा सरचिटणीस अमर उपाध्याय, शैलेश त्रिपाठी आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# सूडबुद्धीचा गजर

शिवसेना नेते व परिवहन मंत्री अनिल परब यांच्या निवासस्थानांवर गुरूवारी ईडीचे छापे पडल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांचे पित्त खवळणे स्वाभाविकच होते. शिवसेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी यानंतर नेहमीप्रमाणे ‘सूडबुद्धी’च्या कारवाईचा राग आळवला. मविआ नेत्यांना आता असे म्हणण्याची सवयच जडली आहे. ईडीची कारवाई होताक्षणी त्यांचा ‘सूडबुद्धी’च्या कारवाईचा गजर सुरू होतो.

**महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळामध्ये ज्याची बरेच दिवस कुजबुज होती, ते अखेरीस घडले. परिवहन मंत्री अनिल परब यांच्या शासकीय निवासस्थानी गुरुवारी पहाटे सक्तवसुली संचलनालयाचे (ईडी) अधिकारी पोहोचले. सरकारी बंगल्यासोबतच त्यांच्या वांद्रे येथील घरातही दिवसभर कारवाई सुरू राहिली. महाराष्ट्रात एकंदर सात ठिकाणी ईडीने कारवाईचा फास आवळला असल्याचे समजते. हे कधीतरी घडणार याची कुजबुज राजकीय वर्तुळात होतीच. अनिल देशमुख आणि नवाब मलिक हे महाविकास आघाडीचे दोन ज्येष्ठ मंत्री यापूर्वीच गजाआड झाले आहेत. आता अनिल परब यांचा नंबर लागणार अशा प्रकारचे भाकित केले जात होते. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते किरिट सोमय्या यांनी तर महाविकास आघाडी सरकारच्या भ्रष्टाचाराची लक्तरे वेशीवर टांगण्याचा जणु विडाच उचलला आहे. गुरूवारच्या कारवाईनंतर अनिल परब यांच्या विरोधातील पुराव्यांची बाब एका वार्ताहराने काढताच संजय राऊत म्हणाले की तांत्रिक तपशीलांची मला माहिती नाही. त्यांच्या या वक्तव्याला हसावे की रडावे तेच कळत नाही. कारवाई कोणत्या गोष्टींच्या आधारे झाली हे समजून घ्यायचे नसेल तर बोलणेच खुंटते. ईडीने केलेली कारवाई अन्यायकारक असेल तर भक्कम पुरावे देऊन हे आरोप फेटाळणे योग्य ठरेल. नुसतेच सूडबुद्धी, सूडबुद्धी असे ओरडणे योग्य होणार नाही. या आधीही महाविकास आघाडी सरकारचे दोन मंत्री गजाआड गेले आहेत. जनतेचे पाठबळ असते तर त्यांच्या अटकेनंतर किती गदारोळ झाला असता याची कल्पनाच केलेली बरी. परंतु तसे काही घडले नाही. इतक्या कारवायांनंतर देखील आपल्याबद्दल जनतेत सहानुभूती का निर्माण होत नाही याचा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी गंभीरपणे विचार करायला हवा आहे. अनिल परब यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप आहेत. न्यायालय त्यावर यथावकाश योग्य तो निवाडा देईलच. त्यांच्या विरोधातील कारवाईसाठी आताचा मुहुर्त का निवडला असा सवाल केला जात आहे. वास्तविक किरिट सोमय्या यांनी कित्येक महिने आधीपासून परिवहन मंत्री परब यांना लक्ष्य केले होते. परब यांच्यासह अंधेरीतील शिवसेना पदाधिकारी संजय कदम यांच्यावर देखील ईडीने कारवाई केली असून ते परब यांचे निकटवर्तीय समजले जातात. अनिल परब यांच्यावरील कारवाई सत्ताधारी आघाडीने गांभीर्याने घेतलेली बरी कारण एका अर्थी शिवसेनेला या घडामोडी नजिकच्या भविष्यकाळात कमालीच्या त्रासदायक ठरू शकतात. अनिल परब यांनी देखील आता कपड्यांची बॅग तयार ठेवावी असे किरिट सोमय्या म्हणाले, त्याला बराच अर्थ आहे. परब यांच्यावरील ही कारवाई शिवसेनेसाठी मोठा धक्का मानला जातो. दापोली येथील कथित बेकायदा रिसॉर्ट आणि मनी लॉड्रिंगच्या आरोपांखातर ईडीने ही कारवाई सुरू केल्याचे सांगण्यात येते. ईडीच्या छाप्यांचे गांभीर्य निदान परिवहन मंत्री अनिल परब यांना तरी जाणवले असेल अशी अपेक्षा. निव्वळ ‘सूडबुद्धी’च्या गजराने काहीही हाती लागणार नाही याचे भान महाविकास आघाडीच्या नेत्यांनी ठेवलेले बरे.**

# अलिबाग शहरातील रस्ते बनले पार्किंगझोन!

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**



अलिबाग शहरात वाहतूक कोंडी ही आता नित्याची बाब झाली आहे. शहरात लोकांची, पर्यटकांची वाहने वाढली आहेत. त्याचबरोबर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना होणारी बेशिस्त पार्किग हे देखील अलिबागमधील वाहतूक कोंडीचे एक महत्त्वाचे कारण आहे. अलिबाग शहरातील रस्ते पार्किंगझोन बनले आहेत.

अलिबाग हे जिल्ह्यांच्या मुख्यालयाचे शहर आहे. त्याचबरोबर पर्यटनस्थळ असून येथे दररोज हजारो पर्यटक येतात. तसेच अलिबाग हे जिल्ह्याच्या मुख्यालयाचे ठिकाण आहे. जिल्ह्याची मुख्य शासकीय कार्यालये अलिबाग शहरात आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा रुग्णालय, जिल्हा न्यायालय तसेच अन्य विभागांची महत्त्वाची कार्यालये आलिबागमध्ये आहेत. त्यामुळे या कार्यालयात आपल्या कामासाठी जिल्ह्यांच्या विविध भागातून नागरिक आलिबाग शहारात येतात. हजारो वाहने अलिबाग शहरातील रस्त्यावर फिरत असतात. त्यामुळे शहरात सकाळी व सायंकाळी वाहतूक कोंडी होत असते.

अलिबाग शहरातील वाहतूक कोंडी सुटावी, यासाठी अलिबाग नगरपरिषदेने शहरातील महेश टॉकीज, एसटी स्थानक, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच समुद्राकडे जाणारा रस्ता ब्राह्मण आळीतील रस्ता अशा काही महत्त्वाच्या रस्तांचे रुंदीकरण केले. तरीदेखील वाहतूक कोंडी होत असते. रस्त्यांचे रुदीकरण झाले. त्याचा गैरफायदा घेतला जात आहे. रुंद झालेल्या रस्त्यांवर दोन्ही बाजूने वाहने उभी करून ठेवलेली असतात. त्यामुळे रस्ते रुंद झाले असले तरी वाहतूक कोंडी समस्या सुटलेली नाही. अलिबाग समुद्राकडे जाणारा जो मुख्य रस्ता आहे, तो पुर्वी अरूंद होता. त्याचे रुंदीकरण करण्यात आले. क्रीडाभुवन मैदानाचा काही भाग रस्ता रुंदीकरणासाठी घेण्यात आला. या मार्गावर मुख्य टपाल कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा सामान्य रुग्णालय आहे. येथे येणारे लोक रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहन उभी करून ठेवतात. जिल्हा रुग्णालयाच्या बाहेरील रस्त्यावर रुग्णवाहिका तर जिल्हा परिषद कार्यालयाबाहेर दुचाकी, चारचाकी वाहने लागलेली असतात. पत्रकार संघाच्या कार्यालयासमोर देखील दोन्ही बाजूने वाहने उभी करून ठेवलेली असतात. हा रस्ता म्हणजे पार्कींग झोन बनला आहे. समुद्राकडे जाणाऱ्या पर्यटक आणि स्थानिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे.

स्टेट बँक ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणारा लोकमान्य टिळक मार्ग आहे. या मार्गावर जिल्हा न्यायालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय, अलिबाग पोलीस ठाणे अशी महत्त्वाची कार्यालये असून एक शाळा एक महाविद्यालय आहे. याठिकाणी दररोज हजारो लोक आपल्या कामासाठी येत असतात. रस्त्याचे रुंदीकरण करुनही वाहतूक कोंडीची समस्या काही सुटलेली नाही. गुरुप्रसाद हॉटेल ते जे. एस. एम . महाविद्यालय या परिसरात वाहतूक कोंडी होते. त्याचबरोबर पुढे चुबकीय वेधशाळा ते जिल्हाधिकारी कार्यालय या परिसारात दोन्ही बजूने वाहने उभी केलेली असल्यामुळे कार्यालयीन वेळेत या मार्गावर वाहतुककोंडी होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा ते माहाविरी चौक हा परिसर वाहतुक कोंडीचे केंद्र आहे. येथे वाहने उभी केली असताच शिवाय फरीवाल्यांची वहाने देखील येथे आसता. अलिबा एसटी आगारातुन एसटी बाहेर पडताना येथे वाहतु कोंडी होते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ रस्ताच अरूंद आहे. तेथे देखील वाहतुककोंडी होत असते. अशोका कॅम्पेक्स ते शेतकरी भवन या मार्ग रूंद आहे. परंतु येथे केव्ही नेहमी वाहतु कोंडी झालेली असतेच. माहावीर चौक त राम मंदिर हा मार्ग आदीच अरूंद आहे. बाजारपेठेतील मार्ग अरूंद आहेत. या मार्गांवर दोन्ही बाजूला वाहने उभी करून ठेवलेली असतात. वाहतूक कोंडी होत असल्यामुळे अलिबाग नगरपरिषदेने काही महत्वाच्या रस्त्यांचे रुंदीकरण केले. मात्र वाहतूक कोंडीची समस्या जैसे थे राहिली आहे. शहरात वाहनांची संख्या वाढली आहे, ही वस्तुस्थिती आहे. वाहतूक कोंडीचे हे एक प्रमुख कारण आहे. त्याचबरोबर उनाड गुरे, रस्त्यांच्या दोन्ही बाजूने बसणारे फेरीवाले, वाहनचालकांचा बेशिस्तपणा व रस्त्यावर दोन्ही बाजूने होणारे बेकायदा पार्किंग ही देखील वाहतूक कोंडीची कारणे आहेत. याकडे लक्ष देण्याची जोरदार मागणी होत आहे.



### प्रशासन, पोलिसांकडून प्रयत्न आवश्यक

**वाहतूक कोंडीची समस्या सुटावी म्हणून ज्या रस्त्यांचे रुंदीकरण झाले आहे ते रस्ते आज पार्किंगझोन बनले आहेत. अलिबाग शहरात जोपर्यंत पार्किंगची व्यवस्था होत नाही, तोपर्यंत ही समस्या सुटणार नाही. वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. शहरात वाहनतळ तयार करायला हवे. ज्यांची वाहने बेकायदेशीरपणे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभी केलेली असतात त्यांच्यावर कारवाई करण्याचे धाडस वाहतूक पोलिसांनी दाखविले पाहिजे. अलिबाग नगरपरिषदेने फेरीवाल्यांवर कारवाई केली तरच अलिबाग शहरातील वाहतूक कोंडी सुटू शकेल.**

## बदलते तंत्रज्ञान



# स्मार्टफोन युजर्स वेळीच व्हा सावध!

स्मार्टफोन हा आपल्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग बनला आहे. आपल्या फोनमध्ये वेगवेगळे ॲप्स असतात. आता प्रत्येक कामासाठी वेगवेगळे ॲप्स आहेत. सध्या असा अहवाल समोर आला आहे, ज्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. धोकादायक स्पायवेअर वेळोवेळी गुगल प्ले स्टोअरवर एक नवा धोका उत्पन्न करतात. सायबर सुरक्षा कंपनी ट्रेंड मायक्रोच्या ताज्या अहवालात असे सूचित केले आहे की, प्ले स्टोअरवरील २००हून अधिक अँड्रॉईड ॲप्समध्ये फेसस्टीलर नावाचा धोकादायक स्पायवेअर आहे, जो केवळ वापरकर्त्यांचा वैयक्तिक डेटाच नाही तर फेसबुक पासवर्ड आणि इतर अनेक तपशील देखील चोरू शकतो.

ट्रेंड मायक्रोला फेसस्टीलर स्पायवेअरसोबतच २०० पेक्षा जास्त ॲप्स, तसेच ४० हून अधिक बनावट क्रिप्टोकरन्सी मायनर ॲप्स सापडले जे क्रिप्टो पैसे चोरण्याचा आणि वापरकर्त्यांच्या परवानगीशिवाय संवेदनशील माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करत होते. अहवालात असे म्हटले आहे की, त्यापैकी काही ॲप्स एक लाखांहून अधिक लोकांनी इंस्टॉल केले होते. काही ॲप्स अनवधानाने वापरकर्त्यांची संवेदनशील माहिती गोळा करत होते.

हे सर्व ॲप्स हजारो लोकांनी इंस्टॉल केले आहेत. अहवालानुसार, गुगल ने या स्पायवेअरची दखल घेतली आणि लगेचच फेसस्टिलरवरून संक्रमित ॲप्स काढून टाकले. तथापि, ज्या वापरकर्त्यांनी यापैकी कोणतेही ॲप्स त्यांच्या स्मार्टफोनमध्ये इंस्टॉल केले आहेत ते ताबडतोब काढून टाकावे जेणेकरुन त्यांनी तुमची कोणतेही वैयक्तिक माहिती गोळा करू नये.

# मराठी साहित्य परिषद ११७ व्या वर्षात!

**निमित्त**

मराठी भाषेची सेवा करणारी आणि मराठी साहित्याच्या प्रचार व प्रसारासाठी झटणारी महाराष्ट्र साहित्य परिषद ही संस्था केवळ पुण्याचेच नाही, तर राज्याचे भूषण ठरली आहे. साहित्य परिषद ही महाराष्ट्रातील आद्य साहित्यसंस्था आज ११७ व्या वर्षात पदार्पण करणार आहे. राज्यात नागरी, ग्रामीण आणि आदिवासी भागात मिळून संस्थेच्या ७० शाखा आहेत. दहा हजारापेक्षा जास्त आजीव सभासद असणारी ही महाराष्ट्रातील एकमेव साहित्य संस्था आहे.

चौथे ग्रंथकार संमेलन २६ आणि २७ मे १९०६ रोजी पुण्यातील नागनाथ पाराजवळच्या मळेकर वाड्यात विद्वान कवी गो. वा. कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. समारोपाच्या दिवशी महाराष्ट्र साहित्य परिषद स्थापन झाली आहे, अशी घोषणा करण्यात आली आणि लो. टिळकांनी या घोषणेला पाठिंबा दिला. साहित्य परिषदेची पुण्याच्या टिळक रस्त्यावरील इमारत १९३५पर्यंत अस्तित्त्वात नव्हती. तिची उभारणी टप्याटप्याने झाली. आरंभीच्या काळात या संस्थेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. असा या संस्थेचा रंजक इतिहास आहे.

’मसाप’तर्फे स्मृतिदिन, व्याख्यानमाला, चर्चा, परिसंवाद, कविसंमेलन, मुलाखती, साहित्य मेळावे, साहित्य संमेलन अशा कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येते. गेल्या पाच वर्षांपासून मसाप गप्पा, कथा सुगंध, एक कवी एक कवयित्री, लेखक तुमच्या भेटीला, शाळांसोबत साहित्य करार असे दर्जेदार उपक्रम राबविण्यात येत आहेत. सुमारे पन्नास हजार जुने व नवे ग्रंथ, दुर्मिळ नियतकालिके, सर्व प्रकारचे कोश, संदर्भग्रंथ यांच्या उपलब्धतेमुळे वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालय अभ्यासकांच्या आकर्षणाचे केंद्र आहे. मराठी भाषा, साहित्य यांच्या अध्ययनाच्या प्रसारासाठी विविध स्तरांवरील परीक्षांचे आयोजन केले जाते. अपंग, वृद्ध, निराधार अशा साहित्यिकांना मानधन देण्यात येते. प्रज्ञावंत साहित्यिकांनी आणि निष्ठावंत साहित्यसेवकांनी ही संस्था नावारूपाला आणली आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ’मसाप’ सतत पाठपुरावा करत आहे. मराठी भाषा विषय सक्तीचा करण्यामध्ये परिषदेचे योगदान आहे. मराठी साहित्यातील सुमारे ४० हजार कवी साहित्यिकांचे नेतृत्व करणारी ही सगळ्यात मोठी साहित्य परिषद आहे. मराठी भाषेचा प्रचार व प्रसारासाठी ही परिषद काम करते. मुंबई, विदर्भ आणि मराठवाडा वगळता उर्वरित महाराष्ट्र हे ’मसाप’चे कार्यक्षेत्र आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि ठाणे जिल्ह्यात शाखा आहेत.

१९६१ मध्ये पुण्याची महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, औरंगाबादची मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद आणि नागपूरचा विदर्भ साहित्य संघ या त्या त्या प्रदेशात काम करणाऱ्या प्रातिनिधिक चार संस्था एकत्र आल्या आणि त्यांनी मराठी भाषेचे, मराठी वाङ्मयाचे व मराठी संस्कृतीचे काही समान प्रश्न सोडवण्यासाठी एक शिखर संस्था निर्माण करावी असे ठरवले. ती संस्था म्हणजेच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ होय. सांगितलेल्या या महामंडळाच्या चार संस्थापक संस्था असून त्या कायम घटक संस्था मानण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र सोडून इतर कोणत्याही राज्यातील, संपूर्ण प्रदेशाकरिता काम करणाऱ्या नोंदणीकृत साहित्य संस्था, तसेच बाहेरील देशांमध्ये त्या संपूर्ण देशाकरिता काम करणाऱ्या नोंदणीकृत साहित्य संस्था यांना महामंडळात समाविष्ट करून घेता येते. सध्या महामंडळातील अशा संस्था मराठी साहित्य परिषद (हैदराबाद), मराठी साहित्य सेवक मंडळ (गोवा), कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद (गुलबर्गा), मराठी साहित्य परिषद (तेलंगण राज्य), छत्तीसगढ मराठी साहित्य परिषद (बिलासपूर) आणि मध्य प्रदेश मराठी साहित्य संघ (भोपाळ) या सामाविष्ट संस्था आहेत. याशिवाय संपूर्ण राज्याचे प्रतिनिधित्व न करणाऱ्या साहित्य संस्थेला संलग्न संस्था म्हणून मान्यता मिळते.



**क्लिक...क्लिक...!** **मुरुड : रायगडमध्ये आलेले पर्यटक समुद्र किनाऱ्यांनाच अधिक पसंती देत असतात. मुरुडच्या समुद्र किनारी पाण्याच्या लाटांमध्ये आनंद घेताना हे पर्यटक.** (छाया: सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर



# सकाळचा नाश्ता दिनचर्येचा एक भाग

सकाळचा नाश्ता हा आपल्या दिनचर्येचा भाग बनलाय. रोज सकाळी नाश्ता करून दिवसाची सुरुवात आपण करतो पण अनेकदा आपल्याला कोणता नाश्ता सकाळी करायला पाहिजे किंवा सकाळच्या नाश्त्यात कोणत्या पौष्टीक गोष्टी असायला हव्यात, याविषयी फारशी कल्पना नसते आणि मग काय तर सकाळच्या नाश्त्याचे गणित बिघडते. सोबतच सकाळचा नाश्ता केल्याने वजन जास्त वाढते, असे म्हटले जाते. खरंच असे होते का? आणि वजन वाढत असेल तर का असे होते? विषयी आज आपण जाणून घेणार आहोत. खरे तर सकाळच्या नाश्त्याचे अनेक फायदे आहेत. तज्ज्ञांच्या मते सकाळच्या नाश्त्यात कॅल्शियम आणि फायबरचे प्रमाण अधिक असते. सकाळचा नाश्ता आवश्यक पोषकतत्त्वासोबत दिवसभर उर्जा देतो.

सकाळच्या नाश्त्यात पौष्टीक आहार असणे गरजेचे आहे. मोड आलेले कडधान्य, गव्हाचा ब्रेड, प्रोटीनसाठी ब्रेड–ऑम्लेट, फळे, सुका मेवा, आंबवलेले पदार्थ जसे की इडली, डोसा, ढोकळा तसेच उपमा, पोहे आदिंचा सकाळच्या नाश्त्यात समावेश करावा.

सकाळच्या पोटभर नाश्त्यात साधारणपणे २६० कॅलरीज असतात. त्यामुळे सकाळचा नाश्ता जर पोटभर केला तर त्यानंतर आपण शरीराची हालचाल करणे किंवा आपली दिनचर्या फॉलो करणे गरजेचे आहे. जर ठप्प बसून राहाल, तर तुमच्या आरोग्यावर विपरीत परीणाम होण्याची शक्यता असते. ज्यामुळे तुमचे वजन वाढते. सोबतच सकाळच्या नाश्त्यात आपण कोणता आहार घेतो, हे सुद्धा वजन वाढण्यास कारणीभूत असते. त्यामुळे सकाळी नाश्त्यात योग्य पौष्टीक आहार घेणे आवश्यक आहे.

# हाळ फाटा-कर्जत-कल्याण राज्य महामार्ग

# जमिनीच्या मोबदल्यासाठी शेतकरी आक्रमक

**कर्जत : प्रतिनिधी**

हाळ फाटा-पळसदरी-कर्जत-कल्याण या राज्य महामार्गासाठी शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली. रस्त्याचे कामही बहुतांशी पूर्ण झाले. मात्र ज्यांना संपादित जमिनीचा मोबदला मिळाला नाही. ते शेतकरी आक्रमक झाले आहेत. मोबदला मिळत नाही, तोपर्यंत आमच्या जमिनीवर रस्त्याचे काम होऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. याबाबत माजी आमदार सुरेश लाड यांनी शेतकऱ्यांच्या मागण्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे सांगितल्या असून न्याय्य न मिळाल्यास जनआंदोलन करण्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे.

हाळ फाटा-पळसदरी-कर्जत-कल्याण हा राज्यमहामार्ग शासनाकडून २०११-२०१२ या वर्षी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने चौपदरीकरण व सुधारणा करण्यासाठी घेतला. मात्र मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संपादित केलेल्या शेतजमीनीचा मोबदला शेतकऱ्यांना दिला नाही. तरीसुध्दा शेतकऱ्यांनी सदरील रस्त्याच्या चौपदरीकरण व सुधारणा करण्यासाठी सहकार्य दाखवले. त्यामुळे या रस्त्याचे ८०टक्के काम पुर्ण झाले आहे.


(छाया : विजय मांडे)

ज्या शेतकऱ्यांनी रस्त्याच्या कामात अडथळा निर्माण केलेला आहे, त्यांच्याविरूध्द महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) पोलीस बळाचा वापर करून रस्त्याचे काम केले असल्याचा आरोप लाड यांनी आपल्या निवेदनात केला आहे. शेतकऱ्यास हे मान्य नाही. हा प्रकार चुकीचा किंवा गैर असून भारतीय राज्य घटनेने शेतकऱ्यांना दिलेल्या स्वातंत्र्यावर व न्याय्य हक्कांवर गदा आणण्याचे प्रयत्न प्रशासकीय अधिकारी करीत आहेत. हे कदापि सहन केले जाणार नाही, असा इशारा माजी आमदार लाड यांनी दिला आहे.

या रस्त्यामध्ये ज्या ठिकाणी वनविभागाच्या जमिनी आहेत त्या ठिकाणी रस्त्याचे काम अपूर्ण स्वरूपाचे आहे. त्याठिकाणी वनविभागाची परवानगी घेतल्याशिवाय काम करता येत नाही मग शेतकऱ्यांचा मालकी हक्क असलेल्या शेत जमिनीवर काम करताना शेतकऱ्यांची परवानगी न घेता एमएसआरडीसी पोलीस बळाचा वापर करून रस्त्याचे काम करीत आहे, हे गैर आहे.

संपादित शेतजमिनीचा शेतकऱ्यांस योग्य तो मोबदला अदा करून रस्त्याच्या कामास सुरुवात करावी, तसे न केल्यास आम्हास जनआंदोलन अथवा उपोषणाच्या मार्गाचा अवलंब करावा लागेल, असा इशारा माजी आमदार लाड यांनी प्रशासनास दिला आहे.

**आमची जमीन हाळफाटा-कर्जत राज्य महामार्गासाठी संपादित करण्यात आली आहे. मात्र २०१२ पासून कोणताही मोबादला मिळालेला नाही. त्यामुळे प्रथम मोबादला देण्यात यावा, तरच सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम करण्यास संमती देऊ.**
**-प्रवीण हडप, बाधीत शेतकरी, नावंढे, ता. खालापूर**

**शेतकऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा होऊन शेतकऱ्यांनीही योग्य सहकार्य दर्शविले आणि डांबरीकरणाला संमती दिली आहे. तसेच शेतकऱ्यांना मोबदला मिळवून देण्यासाठी एमएमआरडीए आणि पालकमंत्र्यांकडे पत्रव्यवहार करणार आहोत.**
**-रमेश खिस्ते, कार्यकारी अभियंता, एमएसआरडीसी**

## शिवभोजन केंद्र तपासणीला सुरूवात

### खालापुरातील नामधारी केंद्राचे धाबे दणाणले

**खोपोली : प्रतिनिधी**

काही शिवभोजन केंद्राचा अपवाद वगळता अनेक केंद्रात थाळी रिकामी असून, शिवभोजन केंद्र चालक शासनाची दिशाभूल करत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर खालापूर पुरवठा विभागाने प्रत्यक्ष तपासणीला सुरवात केल्याने नामधारी केंद्र चालक धास्तावले आहेत.

खालापूर तालुक्यात १५ शिवभोजन केंद्र असून शासन ग्रामीण भागात केंद्र चालकांना एका थाळीमागे पंचवीस रुपये देते तर शहरी भागासाठी पन्नास रुपये दिले जातात. शिवभोजन थाळी गरजूना १०रुपयात दिली जाते. ही थाळी घेताना लाभार्थ्याचा आधारकार्ड क्रमांक नमूद करून त्याचा फोटो घेतला जातो. तसेच प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, असे आदेशही देण्यात आले आहेत. खालापूर तालुक्यातील काही केंद्रावर शिवभोजन थाळीऐवजी थंडगार पाण्याची बाटली तर काही ठिकाणी वडापाव देवून फोटो घेतले जात असल्याचा भांडाफोड झाला होता.

केवळ फोटोसाठी काही केंद्र चालकांनी लाभार्थी तयार केले आहेत. त्यामुळे शासनाची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असून, शिवभोजन केंद्रावर प्रत्यक्ष भेट देवून सत्य परिस्थिती पुरवठा विभागाने तपासणे गरजेचे आहे, अशा आशयाचज वृत्त काही वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले होते. त्याची दखल घेत खालापुरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी शिवभोजन केंद्रांच्या तपासणीचे आदेश दिले होते. नायब तहसीलदार राजश्री जोगी यांनी खालापूर तालुक्यातील शिवभोजन केंद्रावर अचानक भेट दिल्याने वडापाव आणि नामधारी केंद्र चालक धास्तावले आहेत. अनियमितता तसेच गैरप्रकार करणाऱ्यावर कारवाई करणार असल्याचे नायब तहसीलदार जोगी यांनी सांगितले.


(छाया : विनायक माडपे)

## आयुर्वेदचिकित्सा, पंचकर्मसेवेचा रुग्णांनी लाभ घ्यावा -आमदार रविशेठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

प्राचीन काळापासून ऋषीमुनी, वैद्य हे नाडी परिक्षण करून आजाराचे निदान करायचे आणि रुग्णांवर आयुर्वेदिक पंचकर्मचे उपचार करीत असत. यातून रुग्ण खडखडीत बरे व्हायचे. पुढे विज्ञानावर आधारित उपचार पद्धती आल्या. मात्र असे असले तरी निम्म्याहून अधिक रुग्ण अजूनही आयुर्वेदिक चिकित्सा पंचकर्म पद्धतीवर विश्वास ठेवीत आहेत, असे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी पेण येथे केले.

डॉ. सुप्रिया व डॉ. चेतन म्हात्रे यांनी पेणमध्ये श्री विश्वप्रिय आयुर्वेद चिकित्सालय सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

श्री विश्वप्रिय आयुर्वेद चिकित्सालयात पुढील महिनाभर मोफत आरोग्य व मधुमेह तपासणी केली जाईल. औषधांवर ४०टक्के सूट देण्यात येईल, असे डॉ. सुप्रिया चेतन म्हात्रे- चिखलीकर यांनी या वेळी जाहीर केले.

डॉ. सुप्रिया म्हात्रे-चिखलीकर, डॉ. चेतन म्हात्रे, निवृत्त पोलीस उपनिरीक्षक अविनाश म्हात्रे व चिखलेकर परिवाराने यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, माजी उपनगराध्यक्ष वैशाली कडू, माजी नगरसेवक अजय क्षीरसागर, शोमेर पेणकर, अभिराज कडू यांच्यासह पत्रकार या वेळी उपस्थित होते.


(छाया : अनिस मनियार)

## खालापुरातील हातभट्टीवर पोलिसांचा छापा



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील खानाव गावाच्या हद्दीत वनविभागाच्या जागेत बेकायदेशीरपणे चालणारी गावठी दारूची हातभट्टी पोलीस आणि वनविभागाने संयुक्त कारवाई करत उद्ध्वस्त केली आहे.

खानाव गावाचे हद्दीत बोरीमाळ राखीव वन असलेल्या जागेत काही इसम हातभट्टी दारू गाळप करत असल्याची खात्रीलायक माहिती खालापुरचे पोलीस निरीक्षक अनिल विभुते आणि वन परिक्षेत्र अधिकारी राजेंद्र पवार यांना मिळाली होती. त्याच्या आधारे पोलीस आणि वनविभागाच्या पथकांनी त्याठिकाणी छापा टाकला. पोलीस अधिकारी व वन अधिकारी आल्याची चाहूल लागल्याने हातभट्टी गाळप करणारे फरार झाले.पोलिसांनी गावठी दारू आणि त्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले.

या कारवाईत प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील, वनपाल रवींद्र म्हात्रे, पोलीस हवालदार आबासाहेब गेंड, वनरक्षक एन केंद्रे सूर्यवंशी, महिला वनरक्षक संतोषी बस्टेवाड सहभागी झाले होते.

## आदिवासी वाड्यांसाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वंजारपाडा आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसरातील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत होती. त्याची दखल घेत राधामीरा ट्रस्ट तर्फे त्या परिसरातील आदिवासी वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

वंजारपाडा परिसरातील तीव्र पाणीटंचाई लक्षात घेऊन ट्रस्ट तर्फे दोन टँकरद्वारे वंजारवाडी, देवपाडा, वाघाचीवाडी, चिंचवाडी या आदिवासी वाड्यांना गेल्या पाच वर्षांपासून ट्रस्टचे अध्यक्ष भरत मेहरा नियमित मोफत पिण्याच्या पिण्याचा पुरवठा करीत आहेत.

कर्जत तालुक्यातील खांडस भागातील आदिवासी वाड्यांनाही दरवर्षी उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. त्याकरिता राधामीरा ट्रस्टचे अध्यक्ष भरत मेहरा आणखी एक नवीन टँकर खरेदी करणार असून त्या भागातही उन्हाळ्यात नियमित पाणी पुरवणार असल्याचे ट्रस्टकडून सांगण्यात आले. याकामी ट्रस्टचे सचिव ईशान मेहरा, खजिनदार नासिर शेख, सल्लागार ॲड. महेश आगे यांच्यासह ट्रस्टचे कर्मचारी विशेष मेहनत घेत आहेत.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo: 7000023298** **Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-26/2022-2023** Extension to RFx e-tender for work of annual maintenance contract for weed control and rodent treatment at various substations under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs. 17,26,835/-, EMD amount Rs. 17,268/-.** |
| 2 | Online Downloading the RFx | **26.05.2022, 18:00 Hrs. to 02.06.2022, 11:00 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 02.06.2022 up to 11:00 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **03.06.2022 at 11.05 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V.(O&M) DIVN. PANVEL**


## द्रुतगती मार्गावर लेननजीक लोखंडी फलक; ठेकेदाराचा निष्काळजीपणा

**खोपोली : प्रतिनिधी**

अपघातामुळे कायम चर्चेत असलेल्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ठेकेदाराची बेफिकीरी अपघाताला निमंत्रण देत असून काम संपल्यानंतर लोखंडी फलक आणि प्लास्टिक ड्रम लेननजीक ठेवल्याने प्रवाशांवर अपघाताची टांगती तलवार आहे.

अपघातामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर सुरक्षित प्रवासाची खात्री उरलेली नाही. बोरघाट टप्पा सोडला तर ताशी ऐंशी ते शंभरच्या वेगाने वाहने धावत असतात. या मार्गावर काही महिन्यापासून पूणे लेनवर धामणी गावाच्या हद्दीत काम सुरू होते. लेनची दुरूस्ती करताना काही भागात नव्याने क्रॉंक्रिटकरण करण्यात आले आहे. त्याकरिता पुण्याकडे जाणाऱ्या तीनपैकी दोन लेन सुरू ठेवून एक लेन बंद करण्यात आली होती. काम सुरू असलेल्या ठिकाणी ठेकेदारांनी वाहन चालकांना कामाचा अंदाज यावा, यासाठी लोखंडी फलक आणि काही भागात प्लास्टिक ड्रम उभे करून ठेवले होते. आठवड्यापूर्वी धामणी हद्दीतील काम संपल्यानंतर लोखंडी फलक आणि ड्रम लेननजीक संरक्षक कठड्याजवळ ठेवण्यात आले आहेत. वाऱ्याच्या वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे लेननजीक असलेले ड्रम आणि फलक लेनवर आल्यास जिवघेणा अपघात घडू शकतो. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अशा निष्काळजी ठेकेदारांला वेळीच समज देण्याची गरज आहे.

काही महिन्यांपूर्वी याठिकाणी खोदून ठेवलेल्या लेनमध्ये रात्रीच्या वेळेस प्रवासी बसचा अपघात झाला होता. शिवाय कारदेखील पलटी झाली होती.




**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E.H.V. Civil Const. cum Maint. Division, Panvel**
**SRM e-Tender Notice No. 01/2022-23**

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| Rfx No. | Name of work | Estimated Cost in Rs. |
|---|---|---|
| 7000023391 | Civil works/repairs to be carried out at 220KV EHV lines Sub-Dn Padghe under division, Dombivali. | 1943692.00 |
| 7000023386 | Repairing of RCC retaining wall at 220KV Anandnagar Substation. | 2420476.00 |
| 7000023385 | Annual civil maintenance works for Wasambe colony/ 220KV Apta/220KV Tambati/100KV Khopoli substation along with colony with other civil works for the FY 2022-23. | 2273812.00 |
| 7000023384 | Strengthening of old RCC pillar equipment support structures at 100KV Sub station Roha Dist.Raigad. | 1778797.00 |
| 7000023389 | Annual civil maintenance works for Roha/Mahad/Mhasala colonies and 100KV Thal Substation for the FY 2022-23. | 2214025.00 |
| 7000023387 | Annual civil maintenance works for 220KV ONGC, 100KV Jite, 100KV Patalganga, 100KV Bhokarpada, Takka premises, Kalamboli colony, Bhingari premises for the FY 2022-23. | 2419722.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: **www.mahatransco.in.**
**Contact person:** Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325
**Executive Engineer (Civil), Panvel**


## पावसाळा तोंडावर येऊनही उल्हास नदीकडे दुर्लक्ष

### कर्जतकरांना पुराची धास्ती

**कर्जत : प्रतिनिधी**

पावसाळा अगदी तोंडावर आला असूनही उल्हास नदी पात्रातील गाळ काढणे, जलपर्णीच्या विळख्यातून तिची सुटका करणे याकडे कोणाचेच लक्ष नाही. त्यामुळे अतिवृष्टी झाल्यास नदी पात्रातून पाणी वाहून जाण्यास अडथळा होऊन मागील वर्षाप्रमाणेच यंदा पूर परिस्थिती ओढवण्याची भीती कर्जतकरांमधून व्यक्त होत असून नागरिकांनी पुराची चांगलीच धास्ती घेतली आहे.

शहरातील उल्हास नदी निर्मल जल अभियान या संस्थेने नदीचे प्रदूषण थांबविण्यासाठी नदीतील गाळ, जलपर्णी काढण्यासाठी तसेच या मोहिमेला पाठबळ मिळण्यासाठी कर्जतकरांना सामावून घेत प्रभागवार परिषदा घेतल्या. त्याला नागरिकांचाही उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. या सर्वांनी मिळून नगर परिषद प्रशासनाकडे याबाबत पत्रव्यवहार करत पावसाळ्यापूर्वी नदी स्वच्छतेची मागणी केली होती.



**कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीला खेटून मोठमोठ्या इमारती उभारण्यात आल्या आहेत. या इमारतीतील सर्व मैलामिश्रित सांडपाणी थेट नदी पात्रात सोडले जात आहे. तसेच काहीजण रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत नदीपात्रात कचरा फेकत आहे. काही रिसॉर्ट मालकांनी नदीपात्रात बेकायदा बांधकाम केले आहे. त्यांचेही सांडपाणी पात्रात सोडले जात आहे. यामुळे जलप्रदूषण होत आहे.**

**उल्हास नदीपात्राला गाळ आणि जलपर्णीचा विळखा पडला आहे. त्यामुळे पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास पाणी वाहून जाण्यास अडथळा होऊ शकतो. पूर येऊ शकतो.**
**-समीर सोहनी, उल्हास नदी निर्मल जल अभियान**

**उल्हास नदी स्वच्छता मोहीम हा व्यापक विषय असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुढाकार घेऊन ही समस्या दूर करणे अपेक्षित आहे, मात्र तसे होतांना दिसत नाही.**
**-विजय हरिश्चंद्रे, सामाजिक कार्यकर्ते, कर्जत**


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000023390** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-29/2022-2023** RFx e-tender for work of replacement of existing rusted and old earth wire of 220kV Apta– Uran 1 & 2 Lines under EHV Lines S/dn.Panvel under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 19,23,823/-, EMD amount Rs. 19,238/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **26.05.2022, 17:00 Hrs. to 02.06.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 02.06.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **03.06.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

# नवी मुंबईत रस्ते खोदाई सुरूच

## पावसाळा तोंडावर आलेला असल्याने वाहनचालकांसह नागरिकांना होणार मनस्ताप

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळा तोंडावर आलेला असताना नवी मुंबई महापालिका क्षेत्रात रस्ते खोदाई करण्याचे काम सुरूच आहे. त्यामुळे येणाऱ्या पावसाळ्यात वाहनचालकांसह नागरिकांनाही याचा मनस्ताप सहन करावा लागणार आहे.

पावसाळ्यामध्ये शहरात पाणी साचू नये, तसेच अपघात होऊ नये, यासाठी १५ मेपूर्वी रस्ते खोदाई करण्याचे काम हे कंत्राटदाराला पूर्ण करावे लागते; तर १५ मेनंतर रस्ते खोदाई करण्यास परवानगी



(प्रातिनिधीक छायाचित्र)



नाकारण्यात येते. पण शहरात बिनधास्तपणे रस्ते खोदाई करण्यात येत आहे. रस्ते खोदाई करण्यात आलेल्या ठिकाणी तात्पुरती मलमपट्टी करण्यात आली आहे. त्यामुळे या मलमपट्टीमुळे खड्डे पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

> **रस्ते खोदण्याची परवानगी बंद करण्यात आली आहे; तर कोणी खोदकाम करत असल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.**
> **–संजय देसाई, शहर अभियंता, नवी मुंबई महापालिका.**

ऐरोली सेक्टर पाच येथील परिसरामध्ये मलनिस्सारण वाहिन्या टाकण्याचे काम आणि दिघा येथील मुकुंद कंपनीच्या समोरील रस्त्यावर खोदाई करून ठेवण्यात आली आहे. ऐरोलीत नाट्यगृहाचे कामही पूर्ण करण्यात आले नसून त्या ठिकाणी पाणी साचण्याची शक्यता आहे. बिनधास्तपणे खोदकाम करण्यात आल्याने नाहक भुर्दंड नागरिकांना सहन करावा लागणार आहे.

### खोल समुद्रातील मच्छीमारीवर राज्य सरकारकडून बंदी

# मासेमारीवर आधारित व्यावसायिक चिंतेत; बंधने शिथिल करण्याची मागणी

**उरण : रामप्रहर वृत्त**

राज्य सरकारकडून १ जूनपासून ते ३१ जुलैपर्यंतची पावसाळ्यातील दोन महिन्यांची मासेमारीवरील बंदी जाहीर करण्यात आली असून तसा आदेशही काढण्यात आला आहे. मात्र, या बंदीमुळे व्यवसायावर आधारित असलेले खलाशी, बर्फ व्यावसायिक, ट्रक, टेम्पो, चहा विक्रेते यांच्यावरही परिणाम होणार आहे. त्यामुळे मच्छीमारीवरील बंधने शिथिल करण्याचीही मागणी होऊ लागली आहे.

राज्यात मुंबई ते सिंधुदुर्ग असा समुद्रकिनारा असून १५ लाखांपेक्षा अधिक जण मासेमारी व्यवसायावर आपल्या कुटुंबांची गुजराण करीत आहेत. याच मासेमारी व्यवसायातून केंद्र व राज्य सरकारला मोठ्या प्रमाणात विदेशी चलन मिळते तसेच या व्यवसायाशी निगडित अनेक व्यवसाय होत असल्याने असे व्यवसाय करणारी कुटुंबेही याच मासेमारी उद्योगाशी निगडित आहेत. त्यांच्यावरही त्याचा परिणाम होत आहे.

करोनामुळे आधीच मासेमारी



व्यवसाय अडचणीत आला आहे. त्यात आतापर्यंत आलेल्या पाच चक्रीवादळांमुळेही व्यवसायाचे नुकसान झाले आहे. मासेमारी व्यवसायावर निर्बंध आणणारे मासेमारी अधिनियम २०२१ ही राज्य सरकारने आणले आहे. या अधिनियमांमुळे मासेमारीवर अनेक बंधने येण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे प्रचंड दंडाची तरतूदही करण्यात आली आहे. मच्छीमारांना पारंपरिक मासेमारीकडे पुन्हा एकदा नेण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात आहे. इतर राज्यांत अत्याधुनिक मासेमारी होत असताना मासेमारी व्यवसायच

> **पावसाळी मासेमारीत सूट देण्याची मागणी त्यांनी केली आहे. राज्य सरकारने राज्यातील मासेमारीवर १ जून ते ३१ जुलैपर्यंतची बंदी घातली असून यादरम्यान नियमांचे उल्लंघन करून मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.**
> **–सुरेश भारती, सहाय्यक मत्स्य आयुक्त, रायगड**

नष्ट करण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात असल्याचे मत करंजा येथील मच्छीमार विनायक पाटील यांनी व्यक्त केले आहे.

## पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरी कामांची पाहणी करा -पांडुरंग आमले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सानपाडा नोडमधील प्रभाग ३० मधील नागरी कामांची पाहणी करण्याची मागणी भाजपचे सानपाडा नोडमधील युवा नेते पांडुरंग आमले यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नवी मुंबई मनपा आयुक्त अभिजित बांगर यांना निवेदन दिले आहे.

पावसाळा आता अवघ्या काही तासांवर आलेला आहे. पावसाळापूर्व कामे पालिका प्रशासनाने वेळेवर करावीत यासाठी यापूर्वीच पालिका प्रशासनाकडे निवेदन सादर केले असून सतत पाठपुरावाही केलेला आहे. महापालिका प्रभाग ३० मध्ये सानपाडा कारशेड, सानपाडा नोडमधील सेक्टर १२,२,७, ८,९, १० (काही भाग), सेक्टर ११, १५,१६, १६ ए,१७, १८, १९,२०, जुईनगर रेल्वे स्थानक व इतर परिसराचा समावेश होत आहे. या पाहणी अभियानामध्ये प्रभाग ३० मधील सर्वच गटारांची तळापासून सफाई झालेली आहे का?, प्रभाग ३० मधील रस्त्यावरील तसेच अंर्तगत मल:निस्सारण वाहिन्यांची सफाई झालेली आहे का?, प्रभाग ३० मधील आतील व बाहेरील रस्त्यावरील, पदपथावरील, सार्वजनिक ठिकाणावरील वृक्षछाटणी झालेली आहे का?, प्रभाग ३० मधील सर्वच पथदिवे सुस्थितीत आहे का? पुरेसा प्रकाश देतात का?, प्रभाग ३० मधील अंर्तगत व बाह्य रस्त्यांची डागडूजी झालेली आहे का?, प्रभाग ३० मध्ये साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन अभियान राबविण्यास सुरूवात झाली का?, प्रभाग ३० मधील पदपथावर ब्लिचिंग पावडर टाकणेविषयी कितपत नियोजन झाले आहे?, या सर्वांबाबत कितपत कार्यवाही झालेली आहे, याची शहनिशा करता येईल, असे आमले यांनी निवेदनात नमुद केले आहे.

पावसाळ्यात जिवित व वित्त हानी टाळण्यासाठी समस्यांचे निवारण व्हावे यासाठी पाठपुरावा करत आहोत. पालिका प्रशासनाचेही करदात्या नागरिकांना सुविधा मिळण्यासाठी सहकार्य आवश्यक आहे. प्रभाग ३० मध्ये पावसाळी पूर्व कामांची झालेल्या पाहणी विषयी लवकरात लवकर पाहणी अभियान आयोजित करण्याची मागणीही आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

## तळोजात मोटरसायकलची चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा सेक्टर ११ मधील एनएस इन्क्लू प्लॉट नं. ११ या सोसायटी मधून रात्रीच्या वेळी सोसायटीत प्रवेश करून चोरट्यांने मोटरसायकल पळविली आहे. सोसायटीच्या आवारातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही चोरी कैद झाली असून पोलीस तपास करीत आहे. चोरीच्या घटना वाढत असून रात्रीच्या वेळी मोटरसायकल



चालकांनी लॉककरून ठेवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


## बलात्कार प्रकरणातील आरोपीला जन्मठेप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पाच वर्षांपूर्वी खारघर येथे आठ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिचा जीव घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला आजीवन कारावास आणि २२ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा झाली आहे.

खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ओवे गावात राहणारी आठ वर्षीय पीडिता ही घरात एकटी असताना ३१ ऑगस्ट २०१७ रोजी तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. ती ओरडू लागल्याने तिचा गळा आवळून ती बेशुद्ध झाल्यावर तिच्यावर बलात्कार करून आरोपी जान अन्वर आलम हा तेथून फरार झाला होता. खेळण्यासाठी घराबाहेर गेलेला पीडितेचा भाऊ घरी परतल्यानंतर बहीण बेशुद्धावस्थेत पडल्याचे पाहून त्याने शेजाऱ्यांना मदतीसाठी बोलावले. शेजारच्या महिलेने पीडितेच्या आईला फोन करून घरी बोलावून घेतले. तिची आई घरी आल्यावर मुलीने घडलेला सर्व प्रकार सांगितल्यावर तिच्या आईने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. हे प्रकरण पनवेल येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात सुरू होते.

पनवेल सत्र न्यायालयात सोमवारी या प्रकरणाच्या झालेल्या सुनावणीत



न्यायाधीश माधुरी आनंद यांनी दिलेल्या आदेशात आरोपी जान आलम यास आजन्म तुरुंगवासाची शिक्षा आणि २२ हजार रुपये दंड ठोठावला आहे.

## रहिवाशांना निवडणूक ओळखपत्र देण्याची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

प्रभाग ९६ मधील नेरूळ सेक्टर १६, १६ ए आणि १८ मधील रहिवाशांना लवकरात लवकर निवडणूक ओळखपत्र देण्याची मागणी महापालिका निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे भाजप कार्यकर्ते गणेश भगत यांनी एका लेखी निवेदनातून केली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेचा निवडणूक कार्यक्रम कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता आहे. निवडणूकीत अधिकाधिक





मतदान होणे लोकशाहीसाठी आवश्यक आहे.

मतदानाचा कमी टक्का ही बाब भूषणावह नाही. महापालिका प्रभाग ९६ मधील नेरूळ सेक्टर १६, १६ए आणि १८ या परिसरातील रहिवाशांना अजूनही निवडणूकीचे ओळखपत्र मिळालेले नाही. ओळखपत्र नसल्याने मतदानापासून वंचित राहावे लागण्याची भीती स्थानिक रहिवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे. निवडणूक ओळखपत्र मिळाले नसल्याच्या तक्रारीही रहिवाशांकडून आमच्या कार्यालयात करण्यात आलेल्या आहे, असे भगत यांनी निवेदनात नमुद केले आहे.

नेरूळ सेक्टर १६,१६ए आणि १८ मधील रहिवाशांच्या निवडणूक ओळखपत्रासाठी विशेष अभियान लवकरात लवकर राबवून १८ वर्षांवरील प्रत्येक मतदाराला ओळखपत्र उपलब्ध करून देण्याचे संबंधितांना निर्देश देण्याची मागणीही भगत यांनी केली आहे.

## समर्पित आयोगासमोर कोकण विभागातून निवेदने सादर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय राजकीय मागासलेपणाच्या स्वरुपाची व परिणामांची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समर्पित आयोगासमोर बुधवारी (दि. २५) कोकण विभागातील विविध पक्षांसह सामाजिक संस्थांचे प्रतिनिधींनी उपस्थित राहून यासंदर्भातील भूमिका मांडली आणि लेखी निवेदनही सादर केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने ११ मार्च २०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास आरक्षणासाठी समर्पित आयोग गठीत केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या आयोगाच्या कार्यकक्षेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय राजकीय मागासलेपणाच्या स्वरुपाची व परिणामांची चौकशी करण्यासाठी सूचना मागविण्यात आल्या आहेत. आयोगाचे सदस्य कोकण विभागाच्या दौऱ्यावर आले होते. कोकण भवनातील समिती सभागृहात आयोगाने विविध पक्ष, संघटना, संस्था यांचे म्हणने ऐकून



निवेदने स्विकारली.

समर्पित आयोगाचे अध्यक्ष जयंतकुमार बांठिया, सदस्य महेश झगडे, डॉ. नरेश गिते, ह. बा. पटेल, सदस्य सचिव पंकज कुमार, डॉ. शैलेशकुमार दारोकार, प्रा. जेम्स यांच्या उपस्थितीत निवेदने स्विकारण्यात आली. या सर्व निवेदनांची नोंद आयोग घेत असल्याची माहिती समर्पित आयोगाच्या सदस्य सचिवांनी दिली.

मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर जिल्ह्यातील ओबीसी संघटनांचे प्रतिनिधींसोबत अल्पसंख्याक समाजातील प्रतिनिधींनीही निवेदने देत आपली भूमिका मांडली. आयोगाने निवेदने देण्यासाठी दुपारी २.३० ते ४.३० अशी वेळ ठेवली असताना नागरिकांचा प्रतिसाद लक्षात घेत सायंकाळी सुमारे ४.४५ वाजेपर्यंत निवेदने स्विकारण्यात आली. राजकीय पक्षांसह विविध संस्था आणि संघटनांच्या प्रतिनिधींनीदेखील आपली मते नोंदवली.

कोकण विभागातील विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद किंवा महानगरपालिकेत या संदर्भातील निवेदने प्राप्त झाल्यास ती आयोगाकडे पाठवावीत, अशा सूचना आयोगाने दिल्या. या वेळी कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील, उप आयुक्त (प्रशासन) मनोज रानडे, उप आयुक्त (विकास) गिरीष भालेराव, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

समर्पित आयोगाला निवेदन देण्यासाठी कोकण विभागाच्या विविध भागातून आलेले प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. प्रत्येक जिल्ह्याच्या प्रतिनिधींना बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. कोकण विभागाने केलेल्या व्यवस्थेविषयी आयोगाने समाधान व्यक्त केले.

## माजी मंत्री कृपाशंकर सिंग यांचा नवी मुंबई भाजपकडून सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजप प्रदेश उपाध्यक्ष व माजी मंत्री कृपाशंकर सिंग यांची उत्तर भारतीय मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली. भाजप प्रदेश कार्यालयात गुरुवारी (दि. २६) सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील व उत्तर भारतीय मोर्चा प्रदेश अध्यक्ष संजय पाण्डेय यांनी मार्गदर्शन केले. नवी मुंबई उत्तर भारतीय मोर्चाद्वारे जिल्हाध्यक्ष राजेश राय व त्यांच्या सहकाऱ्यांनी भगवान रामाची मूर्ती देत चंद्रकांत पाटील व कृपाशंकर सिंग यांचा सत्कार करण्यात आला.



## दांड-आपटा रस्त्यावरील धोकादायक वृक्षांची छाटणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-आपटा रस्त्यावरील धोकादायक सुकलेली जुनाट वृक्ष आणि दुतर्फा असलेली महाकाय वृक्षांची छाटणी करण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

दांड-आपटा राज्यमार्ग क्रमांक-१०७ लगत रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र असल्याने या रस्त्यावरून सतत वाहतुकीची वर्दळ सुरू असते. या रस्त्यांची दुरवस्था आणि रस्त्यालगतची सुकलेली जुनाट वृक्ष आणि दुतर्फा असलेली महाकाय वृक्ष यामुळे अपघातांना आमंत्रण मिळत आहे. पावसाळ्यात जुनाट वृक्ष उन्मळून रस्त्यावर पडल्याने अनेकांना गंभीर दुखापती झाल्या आहेत. या रस्त्यांचे काम आणि महाकाय जुनाट वृक्ष हटविण्यात यावे यासाठी रसायनी

### रसायनीकरांमध्ये समाधान



पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे, वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायत, चांभार्ली ग्रामपंचायत, पत्रकार, राजकीय पदाधिकारी, सामाजिक संस्था तसेच इतर समाजसेवी संस्थांनी पत्रव्यवहार केला होता.

वाऱ्यामुळे व अतिवृष्टीमुळे दांड-आपटा रस्त्यावरील जुनाट वृक्षांची पडझड होऊन जिवितहानी व वित्तहानी होण्याची शक्यता असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांनी लक्षात घेतले. त्यांनी याकरिता खालापूर तहसीलदार यांना संभाव्य धोका सांगून चर्चा बैठक केल्यानंतर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर वृक्ष छाटणीच्या कामास सुरुवात झाली.

सध्या मोहोपाडा ते गुळसुंदे या रस्त्यावरील एकूण १५५ झाडांची काटछाट होणार असल्याचे विश्वसनीय वृत्त असून पराडे कॉर्नर ते दांडफाटा या रस्त्याचे दुतर्फा असलेली १३ धोकादायक झाडे व ३५ झाडांच्या फांद्या हटविण्यात येणार आहेत. रस्त्यालगत सुकलेली झाडे पुर्णता कट करून काढणार असून रस्त्याच्या दुतर्फा झुकलेल्या फांद्या हटविण्यात येणार आहेत.

# हिरेवाडीमध्ये कुत्रिम पाणीटंचाई

## ठेकेदाराकडून विहिरीतील पाण्याचा बांधकामासाठी वापर



**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील जामरुंग ग्रामपंचायत हद्दीतील हिरेवाड़ी येथील विहिरीतील पाण्याचा वापर येथील स्थानिक व्यवसायिक इमारतीचे बांधकाम करण्यासाठी करीत आहे. विजेचा पंपाद्वारे विहिरीतून पाणीउपसा करण्यात येत असल्यामुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

हिरेवाडीमध्ये ४० घरे असून तेथील ग्रामस्थांसाठी शासनाने नदीच्या बाजूला विहिरी खोदली आहे. या विहिरीचे पाणी ग्रामस्थ पिण्यासाठी वापरतात. मात्र गेल्या काही दिवसांपासून या विहिरीचे पाणी बांधकाम ठेकेदार वापरत आहे. त्यासाठी विजेच्या तीन पंपाद्वारे विहिरीतून पाणीउपसा केला जात आहे. परिणामी विहिरीतील पाण्याची पातळी खालावली आहे. त्यामुळे हिरेवाडीत पाण्याची टंचाई जाणवत असून ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. या बाबत हिरेवाडी ग्रामस्थांनी जामरुंग ग्रामपंचायतीला वारंवार लेखी अर्ज दिले. मात्र त्याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष झाल्यामुळे ग्रामस्थांनी कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख यांना भेटून निवेदन दिले आहे. विहिरीच्या पाण्याचा वापर अन्य कोणालाही खासगी कामासाठी करून देऊ नये, अशी मागणी हिरेवाडी ग्रामस्थांनी या निवेदनाद्वारे तहसीलदारांकडे केली आहे.

> **हिरेवाडीमधील विहिरीची तहसीलदारांनी तत्काळ पाहणी करावी आणि संबंधित बांधकाम व्यवसायिकाची जलवाहिनी काढून टाकून, त्याच्यावर कारवाई करावी. अन्यथा आम्ही आंदोलन करू.**
> **–भरत शिद, अध्यक्ष, कर्जत तालुका आदिवासी संघटना**



(छाया : संतोष पेरणे)

# ...आणि महामार्गावरील यंत्रणा सतर्क झाल्या




(छाया : विनायक माडये)

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर विशेषतः बोरघाट व खोपोली हद्दीत अपघातांचे वाढते प्रमाण हे प्रशासनाची डोकेदुखी ठरत आहे. गुरुवारी (दि. २६) सकाळी मॉर्निंगवाककरिता येथील डॉ. मोहिते खंडाळा घाटात जात असताना त्यांना एका टेम्पोतून धूर येत असल्याचे दिसले. त्यांनी तत्काळ दूरध्वनीवरून सदरची बाब अपघातग्रस्त मदत टीमचे गुरूनाथ साठीलकर यांना सांगितल्यानंतर सदरचे वृत्त सोशल मीडियावर प्रसारित झाले. त्यामुळे साऱ्याच मदत यंत्रणा सतर्क झाल्या. खोपोली अग्निशामक दल, आयआरबी यांच्यासह इतर मदत यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या आणि साऱ्यांनी मिळून टेम्पोमधील आग काही क्षणातच विझवली.

टेम्पो हा पनवेल येथून पुणे येथे जात होता. सदरचा अपघात शिंग्रोबा मंदिराच्या वरच्या बाजूला झाला. टेम्पोमध्ये पाण्याच्या बाटल्या होत्या, त्यातील बॉक्स फोडून प्रथम आग विझविण्याचा प्रयत्न सुरू झाला होता. पण मदतयंत्रणा घटनास्थळी पोहोचल्यानंतर पूर्णपणे आग विझवण्यात यश आले. टेम्पोचालकाने सर्वांचे आभार मानले. अशा घटनांमध्ये सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम आहे, हेही तितकंच खरं आहे.

# शर्यतीत बैलांना मारहाण

### व्हिडीओ व्हायरल, आरोपींवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

बैलगाडी शर्यतीत चालकांनी आपल्या बैलांना क्रूरतेने मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल होऊन युट्युब चॅनेलवर दिसून आल्याने याप्रकरणी आरोपींवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माणगाव तालुक्यातील मोर्बा येथे मंगळवारी बैलगाडी शर्यतींचे आयोजन करण्यात आले होते. या शर्यतीत भाग घेतलेल्या अनेक बैलगाडी चालकांनी बैल वेगाने पळावे याकरिता त्यांना काठीने मारहाण केल्याचे व्हायरल झालेल्या युट्युबवरील व्हिडीओमध्ये दिसत आहे. त्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून व्हॉट्सअ‍ॅपवर आलेल्या लिंकवरून मिळाल्यानंतर माणगाव तालुका लघु पशुवैद्यकीय चिकित्सालयचे डॉ. धनंजय बाबुराव डुबल (वय ५१) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

या प्रकरणी अनोळखी बैलगाडीवरील अज्ञात बैलगाडी चालकांवर माणगाव पोलीस ठाण्यात प्राण्याचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११(१)(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक फौजदार जितेंद्र वाटवे करीत आहेत.

# नेरळ ग्रामपंचायतीकडून नालेसफाई कामाला सुरुवात

**कर्जत : बातमीदार**

नेरळ ग्रामपंचायतीने मान्सूनपुर्व नालेसफाईच्या कामाला सुरुवात केली असून, गावातील केवळ एका नाल्याचे काम सध्या सुरु आहे.

नेरळ गावाचा विस्तार मोठा असून, येथील गटारे आणि नाले हे झाडाझुडपांनी व्यापले आहेत. बाजारपेठ भागातील गटारे ग्रामपंचायतीचे आरोग्य कर्मचारी दररोज स्वच्छ करतात. मात्र पावसाळा येण्यापूर्वी गावातील मुख्य नाले स्वच्छ करण्याची गरज होती.

नेरळ गावातील दोन मोठे नाले रेल्वे पुलाजवळ एकत्र येऊन उल्हास नदीला मिळतात. त्यातील एक नाला माथेरानच्या डोंगरातून येणारे पावसाचे पाणी वाहून नेतो. गणेशनगर पायरमाळ भागातील लोकांनी टाकलेल्या वस्तू तसेच झाडा–झुडपांनी तो नाला व्यापला आहे. या नाल्याला नेरळ टॅक्सी स्टॅन्डजवळ मोहचीवाडी येथून येणारा दुसरा नाला मिळतो आणि उल्हास नदीकडे जातो. या सर्व नाल्यांची सफाई नेरळ ग्रामपंचायतीने करण्याची गरज आहे, मात्र सध्या नेरळ पोलीस ठाण्याच्या बाजूला असलेल्या नाल्यातील गाळ काढण्याचे काम सुरु असून गावातील सर्व अन्य नाले यांची साफसफाई अद्याप बाकी आहे.



> **नेरळ गावातील नालेसफाई करण्याचे नियोजन करण्यात आले असून जेसीबीच्या सहाय्याने ही नालेसफाई केली जात आहे. प्रथम मोठ्या नाल्यांची साफसफाई करण्यात येणार आहे.**
> **–गणेश गायकर, ग्रामविकास अधिकारी, नेरळ ग्रामपंचायत**

# मुरूड तालुक्यातील बागायतदारांना दिलासा

## खरेदी-विक्री संघाने सुपारीला दिला प्रतिमण ७५२० रुपये भाव

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुका सुपारी खरेदी–विक्री संघाने यंदा असोली सुपारीला प्रतिमण ७५२० रुपये इतका सर्वाधिक उच्चांकी भाव जाहीर केला आहे. गेल्या वर्षी हाच दर ६४०० रुपये इतका होता. या वर्षी वाढीव दर दिल्यामुळे मुरुड तालुक्यातील बहुउपयोगी सुपारी पिकवणाऱ्या बागायतदारांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



(छाया : संजय करडे)

घराघरात धार्मिक कार्यासाठी, कलर टैनिंग, खायच्या पानांमध्ये आणि मुखवासासाठी वापरली जाणारी सुपारी बहुपयोगी आहे. तालुक्यांत प्रामुख्याने आगरदांडा, शिघ्रे, नांदगाव, मुरुड, भोईघर, चिकणी, काकळघर, मांडला, मांडला, राजपुरी, माझेरी, मजगाव आदी ठिकाणी सुपारी पिकवली जाते. मुरूडच्या सुपारीला श्रीवर्धन रोठा अर्थात एसएमएस या ट्रेडमार्कने संपूर्ण देशभरात मागणी असते. याशिवाय बांग्लादेश, पाकिस्तान व मध्य–पूर्व देशात सुपारी निर्यात होते. खासगी व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक टाळण्यासाठी सुपारी बागायतदारांना संघटीत करून ८४ वर्षांपूर्वी सहकार तत्त्वावर मुरूड तालुका सुपारी खरेदी–विक्री संघाची स्थापना करण्यात आली. मुरूडचा हा सुपारी संघ येथील बागायतदारांना आधारवड ठरला आहे. आज या सुपारी संघाची कोट्यवधी रुपयांची वार्षिक उलाढाल होत असून जास्तीत जास्त उत्पन्न मिळवून देण्याचा प्रयत्न संचालक मंडळ करत आहे.

मुरुड तालुक्यात सुपारी लागवडीचे क्षेत्र ४५० हेक्टर असले तरी ३९९ हेक्टर क्षेत्र हे उत्पादन क्षेत्र आहे. दोनवर्षा पूर्वी निसर्ग चक्रीवादळात १४२ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले होते.

खरेदी–विक्री संघाने २०१९ मध्ये सुपारीला प्रति मण (२० किलो) ३९०० रुपये, सन २०२० मध्ये ४१२० रुपये, सन २०२१ मध्ये ६४०० रुपये भाव दिला होता. यंदा सुपारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष महेश भगत यांनी सुपारीला प्रतिमण ७५२० रुपये इतका सर्वाधिक भाव जाहीर केला आहे.

दरम्यान, कोकण किनारपट्टीवरील जमीन सुपारी बागायत क्षेत्र वाढीसाठी सुयोग्य असून, सुपारी पुनर्लागवड व पुनरुज्जीवन करण्यासाठी शासकीय योजना उपलब्ध आहेत. तरी सुपारी उत्पादकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले आहे

> **वेबसाईटमुळे सुपारीला थेट बाजारपेठ मिळाली असून, सुरत व अहमदाबाद येथील प्रक्रिया करणाऱ्या उद्योजकांशी जोडल्या गेल्यामुळे दलाली द्यावी लागत नाही. परिणामी सभासदांना चांगला भाव मिळवून देणे सुपारी संघाला शक्य होते.**
> **–जगदिश पाटील, संचालक, मुरूड तालुका सुपारी खरेदी–विक्री संघ**

# मुंबई ते मांडवा जलवाहतूक सेवा बंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई ते मांडवा दरम्यान चालणारी जलवाहतूक सेवा २६ मेपासून बंद करण्यात आली आहे. पावासाळ्याच्या पार्श्वभुमीवर खबरदारी म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र त्याच वेळी भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान चालणारी रो रो जलवाहतूक सेवा नियमितपणे सुरु राहणार आहे.

मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया ते मांडवा दरम्यान जलप्रवासी वाहतूक केली जाते. पीएनपी, मालदार आणि अजंठा अशा तीन खाजगी ऑपरेटर्स मार्फत ही जलवाहतूक सेवा पुरवली जाते. दरवर्षी या मार्गावरून सुमारे १२ लाख प्रवासी ये–जा करत असतात. कोकणातील सर्वाधिक प्रवासी संख्या असलेला हा जलमार्ग म्हणून ओळखला जातो. या शिवाय या मार्गावरून खाजगी स्पीड बोटींचीही मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु असते.

पावसाळ्यात प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ही जलवाहतूक बंद ठेवण्यात येते. या काळात समुद्र खळवळलेला असल्याने बोटींना धोका उद्‌भवू शकतो त्यामुळे खबरदारी म्हणून तीन महिने ही बोटसेवा बंद ठेवण्यात येत असते. यंदा २६ मेपासून या मार्गावरील सर्व बोटसेवा बंद करण्याचे निर्देश मेरीटाईम बोर्डाने दिले होते. त्यानुसार गेट वे ऑफ इंडीया ते मांडवा दरम्यान चालणारी बोट सेवा बंद करण्यात आली आहे. मात्र भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान चालणारी रो रो सेवा नियमित सुरु राहणार आहे.

# कर्जतचे शिरीष कांबळे पुरस्काराने सन्मानित

**कर्जत : बातमीदार**

विनातिकिट प्रवास करणाऱ्या १००५ प्रवाशांकडून साडेआठ लाख रुपयांचा दंड वसूल केल्याबद्दल मध्य रेल्वेचे मुख्य सतर्कता निरीक्षक शिरीष श्याम कांबळे यांना उपमहाप्रबंधक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कर्जतचे सुपुत्र शिरीष कांबळे हे मध्य रेल्वेचे मुख्य सतर्कता निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. शिरीष कांबळे यांनी ११ मार्च २०२२ रोजी पवन एक्सप्रेस आणि १३ मार्च २०२२ रोजी गुवाहाटी एक्सप्रेस या गाड्यांतून बेकायदेशीर तसेच विनातिकीट प्रवास करणाऱ्या तब्बल १००५ प्रवाशांना पकडले होते.

त्या सर्व प्रवाशांकडून आठ लाख ६९ हजार ६३० रुपयांचा दंड वसूल केला होता. या कामगिरीची दखल घेत शिरीष कांबळे यांना उपमहाप्रबंधक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




# महाडमध्ये रंगला महिला भजनांचा मेळा; भाजपचा आगळावेगळा उपक्रम

**महाड : प्रतिनिधी**

भाजप महिला मोर्चाच्या वतीने महाडमध्ये बुधवारी (दि. २५) महिलांच्या भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या आगळ्यावेगळ्या स्पर्धेला महाडकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेत ग्रामीण भागातील १४ महिला भजनी मंडळांनी सहभाग घेतला होता.

महाड भाजप महिला मोर्चाच्या वतीने बुधवारी शहरातील ब्राह्मण सभागृहात महिला भजन स्पर्धा घेण्यात आली. सकाळी १० वाजता सुरू झालेली ही स्पर्धा रात्री ८ वाजेपर्यंत सुरु होती. १४ महिला भजनी मंडळांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. दरम्यान भजनाचा आनंद लुटण्यासाठी चाहत्यांनी तुफान गर्दी केली होती.

भाजप सांस्कृतिक सेल संयोजक केदार आठवले, ज्ञानेश्वर धनावडे, राकेश मेस्त्री यांनी स्पर्धेचे परिक्षक म्हणून काज पाहिले. या अनोख्या स्पर्धेत कुलस्वामिनी प्रासादिक भजनी मंडळ जिते यांचा प्रथम क्रमांक आला तर आशिर्वाद भजनी मंडळ काकरतळे महाड यांचा दुसरा क्रमांक व स्वानंद भजनी मंडळ वरंध यांचा तिसरा क्रमांक आला. सोलो परफॉर्मन्समध्ये श्रृती सुदेश आधव यांना गौरविण्यात आले तर स्पर्धेत सहभाग घेतलेल्या सर्व महिला भजनी मंडळांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा हेमा मानकर यांच्या हस्ते विजेत्यांना रोख रक्कम व पारितोषिक देण्यात आले.

भाजप महिला मोर्चाच्या महाड विधानसभा संयोजिका युगंधरा गोडबोले, जिल्हा सरचिटणीस डॉ. मंजुषा कुद्रीमोती, भाजपचे तालुका सरचिटणीस महेश शिंदे, वाहतूक सेलचे अध्यक्ष नाना पोरे, सोशल मीडिया अध्यक्षा श्वेता ताडफळे आदि मान्यवर या वेळी उपस्थित होते.

भाजप शहर अध्यक्षा नमिता दोशी, गौरी मेहंदळे, लिना शहा, मंजिरी कुलकर्णी, मिनल बुटाला, प्रज्ञा प्रकोष्ठ, श्रध्दा भोसले, प्रिती करमरकर, जिगेशा शहा, अश्विनी मोरे, आदिंनी ही भजन स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.






(छाया : महेश शिंदे)

# बंगळुरुचा लखनऊवर थरारक विजय

**कोलकाता : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेमध्ये बुधवारी (दि. २५) एलिमिनेटर लढतीत लखनऊ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूमध्ये झालेल्या सामन्यात बंगळुरूने बाजी मारली. बंगळुरूने लखनऊच्या संघाचा १४ धावांनी पराभव करीत क्वॉलिफायर २ मध्ये प्रवेश केला, पराभवामुळे लखनऊ सुपर जायंट्सचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिलेल्या २०८ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या लखनऊची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. सलामीवीर क्विंटन डी कॉक अवघ्या सहा धावा करून तर मनन वोहरा १९ धावांवर बाद झाले. त्यानंतर कर्णधार केएल राहुल आणि दीपक हुड्डा यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दीपकने ४५ धावा केल्या.

लखनऊचा कर्णधार केएल राहुलने एकाकी किल्ला लढवत विजय मिळवण्यासाठी कसोशीने प्रयत्न केला, मात्र जोश हेजलवुडने त्यालाही महत्त्वाच्या क्षणी बाद करीत लखनऊच्या स्वप्नांवर पाणी फिरवले. आरसीबीच्या वतीने जोश हेजलवुड सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने तीन बळी



मिळवले तर मोहम्मद सिराज, हर्षल पटेल आणि वानिंदू हसरंगा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. त्यापूर्वी, पावसाच्या व्यत्ययामुळे उशीरा सुरू झालेल्या या सामन्यामध्ये लखनऊचा कर्णधार केएल राहुलने नाणेफेक जिंकून बंगळुरूला प्रथम फलंदाजी करण्यासाठी निमंत्रण दिले होते.

सुरुवातीला त्याचा हा निर्णय योग्य वाटत होता, मात्र बंगळुरूच्या रजत पाटीदारने राहुलच्या या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. रजतने आक्रमक खेळ करीत धमाकेदार शतक साजरे केले. रजत पाटीदारने अवघ्या ५४ चेंडूंचा सामना करत नाबाद ११२ धावा केल्या आहेत. त्यामध्ये १२ चौकार आणि सात षटकारांचा समावेश आहे.

नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या आरसीबीची सुरुवात चांगली झाली नाही. सर्वात भरवशाचा फलंदाज म्हणून ज्याच्याकडे बघितले जात होते तो कर्णधार फाफ डू प्लेसिस गोल्डन डकवर बाद झाला. त्यावेळी आरसीबीची अवस्था एक बाद चार अशी होती. त्यानंतर विराट कोहली आणि रजत पाटीदार यांनी फलंदाजीची धुरा सांभाळली. दोघांनी मिळून ६६ धावांची भागीदारी केली, पण अगोदर विराट कोहली आणि त्यापाठोपाठ ग्लेन मॅक्सवेल बाद झाल्याने आरसीबीचा संघ संकटात आला होता. रजत पाटीदारच्या वादळी खेळीमुळे आणि दिनेश कार्तिकच्या ३७ धावांच्या बळावर आरसीबीने लखनऊ समोर २० षटकांमध्ये २०७ धावांचे आव्हान उभे केले होते.

लखनऊ सुपर जायंट्सच्यावतीने मोहसीन खान, आवेश खान, कृणाल पंड्या आणि रवी बिश्नोई यांना प्रत्येकी एक बळी मिळाला.

## युनिफाईट नॅशनल चॅम्पियनशिप २०२२

# महाराष्ट्र युनिफाईट वेलफेअर असोसिएशन प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युनिफाईट नॅशनल चॅम्पियनशिप २०२२चे आयोजन युनिफाईट इंडियन असोसिएशन हिमाचल प्रदेश येथील पालमपूर येथे २१ आणि २२ मे दरम्यान करण्यात आले होते. महाराष्ट्र युनिफाईट वेलफेअर असोसिएशन यांना या राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे अजिंक्यपद प्राप्त झाले. या स्पर्धेत महाराष्ट्र, आसाम, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, तामिळनाडू, पंजाब, हरियाणा आणि दिल्ली या राज्यातून ३५९पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेत वेदांत कायंदेकर, प्रद्युम्न म्हात्रे, रोहित भोसले, वरद केणी, समिक्षा कायंदेकर, कृपाश्री शेट्टी, सई शिंदे, यश जोशी, मधुरा गायकवाड, अलोक निर्मल, आरव शेट्टी, शिवप्रेम जुवले, प्रणब कांबळे, नावीन्य साळगावकर, साहिल कुलते, वरद कालंगे, रोहित मालविया, सुजय वेंगुर्लेकर, यश जोशी आणि रितुल म्हात्रे यांनी सुवर्णपदक पटकावले. रजत पदक विजेते रुद्रा चौधरी, दिपेश जाधव, तेजस मोहिते, कृष्णा पांडे, श्रेयस म्हात्रे आणि यश पाटील ठरले, तर कांस्य पदक विजेते श्रुधी सुपे, ध्रुव वनकर यांनी पटकावले.

या सर्व खेळाडूंची निवड आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे. या सर्व खेळाडूंचा सत्कार युनिफाईट वेलफेअर असोसिएशनचे सचिव आणि मार्गदर्शक डॉ. मंदार पनवेलकर, अध्यक्ष संतोष खंदारे, सुनील वडके, रविंद्र म्हात्रे, सागर कोळी, निलेश भोसले, प्रशांत गांगर्डे यांच्या हस्ते करण्यात आला. टीम मॅनेजर म्हणून अविनाश डांगरे यांनी काम पाहिले.

# धैर्य पाटीलची ६६ चेंडूत ११३ धावांची नाबाद खेळी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई येथे सुरू असलेल्या १२ वर्षाखालील नवी मुंबई प्रेमिअर लीग लेदर बॉल स्पर्धेत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस कॉम्प्लेक्स येथील आय थिंक स्पोर्टस क्लबच्या धैर्य किशोर पाटील याने ६६ चेंडूत ११३ धावांची नाबाद खेळी करत बीपी पाटील सुपर किंग संघाला दणदणीत विजय मिळवून दिला तसेच या सामन्यात केलेल्या अष्टपैलू कामगिरीबद्दल सामनावीर होण्याचा मानही त्याने पटकाविला.

धैर्य पाटील याने गुरुवारी (दि. २६) एफजी रॉयल संघाविरुद्ध १९ चौकार व २ षटकारांची आतषबाजी करून नाबाद ११३ धावा बहारदार खेळी केली व गोलंदाजीत २ विकेट घेतल्या. त्याच्या कामगिरीबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे.

## धवनचा ‘तो’ व्हिडिओ करमणूक म्हणूनच!

**मुंबई** : आयपीएलमधून बाहेर पडल्यानंतर धवनने एक नवीन रील शेअर केला असून त्यामध्ये त्याचे वडील त्याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण करताना दिसत आहेत. आजूबाजूचे लोक त्यांना थांबवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. यामध्ये एक जण पोलिसांच्या वेशात असल्याचंही दिसतंय. धवनने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर हा व्हिडीओ शेअर केला आहे. खरोखरच धवन बाप-बेट्यांमध्ये काही वाद झाला असे वाटत अनेकांना असले तरी हा व्हिडीओ धवनने केवळ मनोरंजन म्हणून बनवलाय.

# चेसेबल मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत प्रज्ञानंदची अंतिम फेरीत धडक

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारताचा युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने चेसेबल मास्टर्स ऑनलाइन बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. ही कामगिरी करणारा तो पहिला भारतीय बुद्धिबळपटू ठरला आहे.

प्रज्ञानंदने मोक्याच्या क्षणी आपला खेळ उंचावत उपांत्य फेरीत हॉलंडच्या अनिश गिरीला ३.५-२.५ असा पराभवाचा धक्का दिला. उपांत्य फेरीत चार डावांअंती दोन्ही खेळाडूंमध्ये २-२ अशी बरोबरी होती. मग बरोबरीची कोंडी सोडवण्यासाठी झालेल्या टायब्रेकरमध्ये प्रज्ञानंदने बाजी मारत अंतिम फेरीतील स्थान सुनिश्चित केले.

या फेरीत त्याच्यापुढे जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानी असलेल्या चीनच्या डिंग लिरेनचे आव्हान असेल. लिरेनने उपांत्य फेरीत पाच वेळा जगज्जेत्या मॅग्नस



कार्लसनवर २.५-१.५ अशी मात केली.

बुधवारी (दि. २५) झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात १६ वर्षीय प्रज्ञानंदविरुद्ध जागतिक क्रमवारीत दहाव्या स्थानी असलेल्या गिरीचे पारडे जड मानले जात होत, परंतु, पहिल्या डावापासून प्रज्ञानंदने गिरीला उत्तम झुंज दिली. पहिला डाव बरोबरीत सुटल्यानंतर प्रज्ञानंदने दुसऱ्या डावात विजयाची नोंद केली. तिसऱ्या डावात सुरुवातीच्या चालींमध्ये गिरीने वर्चस्व गाजवले, मात्र प्रज्ञानंदने दमदार पुनरागमन करताना हा डाव बरोबरीत सोडवला आणि एकूण लढतीत २-१ अशी आघाडी मिळवली, परंतु गिरीने आपला अनुभव पणाला लावताना चौथा डाव जिंकल्याने लढतीत २-२ अशी बरोबरी झाली.

विजेता ठरवण्यासाठी झालेल्या टायब्रेकरच्या पहिल्या अतिजलद (ब्लिट्झ) डावात गिरीला सर्वोत्तम खेळ करण्यात अपयश आले. त्याने ३३ चालींअंती या डावात हार पत्करली. त्यामुळे आपले आव्हान कायम राखण्यासाठी टायब्रेकरच्या दुसऱ्या डावात गिरीला विजय अनिवार्य होता, मात्र प्रज्ञानंदने त्याला पुनरागमनाची संधी दिली नाही. हा डाव बरोबरीत सुटल्यामुळे प्रज्ञानंदने अंतिम फेरीत प्रवेश केला.

# राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत हितेश भोईरची सुवर्ण कामगिरी



**उरण : प्रतिनिधी**

उरणच्या हितेश भोईरने केरळ येथे झालेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेमध्ये वैयक्तिक तीन सुवर्ण पदकांची कमाई करून आपली छाप उमटवली आहे. हितेशच्या यशाबद्दल राज्यभरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

तिरुअनंतपुरम मास्टर्स गेम असोसिएशन, केरळ यांच्या वतीने तिरुअनंतपुरम येथे नुकतेच चौथ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये उरणमधील हितेश भोईर यांनी या स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व केले होते. स्पर्धेमधील वर्चस्व राखण्यासाठी आलेल्या सर्वच स्पर्धकांनी खूप मेहनत घेतली होती, मात्र हितेशने मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर या स्पर्धेमध्ये ५० मी. फ्रिस्टाईल, १०० मी. फ्रिस्टाईल आणि ४०० मी. फ्रिस्टाईल या तीन जलतरण प्रकारांमध्ये वैयक्तिक तीन सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. तर ४-५० मी. फ्रिस्टाईल रिले आणि ४-५० मी. मिडले रिले या दोन सांघिक जलतरण प्रकारांमध्ये सिल्व्हर मेडल मिळवून दिले आहे.

हितेश भोईर हे उरणमधील नगरपालिकेच्या स्विमिंग पुलवर प्रशिक्षक म्हणून काम पाहात आहेत. त्यांनी घडवलेल्या स्पर्धकांनी पनवेल येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये उत्तम कामगिरी केली आहे. हितेशच्या यशाची बातमी कळताच त्याच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# फ्रेंच खुली टेनिस स्पर्धेत त्सित्सिपासचा विजय



**पॅरिस : वृत्तसंस्था**

गतउपविजेत्या ग्रीसच्या स्टेफानोस त्सित्सिपासने फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीत निसटत्या विजयाची नोंद केली. तसेच गतविजेता नोव्हाक जोकोव्हिच आणि तिसऱ्या मानांकित अॅलेक्झांडर झ्वेरेव्ह यांनी आपापल्या दुसऱ्या फेरीतील लढतीत विजय मिळवला. महिला एकेरीत अरिना सबालेंका, व्हिक्टोरिया अझरेंका यांनी आगेकूच केली.

पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीतील चुरशीच्या लढतीत चौथ्या मानांकित त्सित्सिपासने इटलीच्या लोरेंझो मुसेट्टीला ५-७, ४-६, ६-२, ६-३, ६-२ असे पराभूत केले. पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत अग्रमानांकित सर्बियाच्या जोकोव्हिचने स्लोव्हाकियाच्या अॅलेक्स मोलकानवर ६-२, ६-३, ७-६ (७-४) असा विजय मिळवला. सामन्यातील पहिले दोन सेट जोकोव्हिचने सहज जिंकले, मात्र, तिसऱ्या सेटमध्ये मोलकानने त्याला आव्हान दिले.

गेल्या पर्वात उपांत्य फेरी गाठणाऱ्या झ्वेरेव्हने पिछाडीवरुन मुसंडी मारत अर्जेटिनाच्या सेबॅस्टियन बाएजला २-६, ४-६, ६-१, ६-२, ७-५ असे पराभूत करत पुढची फेरी गाठली. तसेच कॅनडाच्या नवव्या मानांकित फेलिक्स ऑगर-अॅलिसिमेने अर्जेटिनाच्या कॅमिलो उगो काराबेलीला ६-०, ६-३, ६-४ असे नमवले.

महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत दोन वेळा ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेची विजेती आणि १५व्या मानांकित अझरेंकाने जर्मनीच्या आंद्रेया पेट्कोव्हिचला सरळ सेटमध्ये नमवत आगेकूच केली, तर जर्मनीच्या अँजेलिक कर्बरने फ्रान्सच्या एल्सा जॅक्केमोटला ६-१, ७-६ (७-२) अशा फरकाने नामोहरम केले. रोमेनियाच्या सिमोना हालेपने जर्मनीच्या नस्ताया शंकला पराभूत करीत दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवला. सातव्या मानांकित सबालेंकाने क्लोइ पॅक्केला नमवले, परंतु ब्रिटनच्या रॅडूकानूला सान्सोव्हिचकडून ६-३, १-६, १-६ अशी हार पत्करावी लागली.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com